# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ५१

## सभावृत्तांत

दिनांक - २०.११.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे नोव्हेंबर-२०१५ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.११.२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
२. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
३. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा.भालेकर अरुणा दिलीप
५. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.थोरात वनिता एकनाथ
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.जगदीश शेट्टी
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१७. मा.उल्हास शेट्टी
१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१९. मा.पवार संगीता शाम
२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.भारती फरांदे

२५. मा.आर.एस.कुमार

२६. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२८. मा.पांढरकर निलेश शंकरराव

२९. मा.राजू मिसाळ

३०. मा.नंदा विकास ताकवणे

३१. मा.नेटके सुमन राजेंद्र

३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३४. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३७. मा.लोंढे गणेश नारायण

३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३९. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४१. मा.अपर्णा निलेश डोके

४२. मा.अनंत सुभाष को-हाळे

४३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४४. मा.जयश्री वसंत गावडे

४५. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४६. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४७. मा.शेख अस्लम शैकत

४८. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४९. मा.वाबळे संजय मल्हारराव

५०. मा.मडिगेरी वर्षा विलास

५१. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५३. मा.सुपे आशा रविंद्र

५४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५५. मा.मोहिनीताई विलास लांडे

५६. मा.अजित दामोदर गव्हाणे

५७. मा.गोफणे अनुराधा देविदास

५८. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५९. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६०. मा.महेशदादा किसन लांडगे

६१. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६२. मा.लोंढे शुभांगी संतोष

६३. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६४. मा.सावळे सिमा रविंद्र

६५. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६६. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६७. मा.पालांडे सुजाता सुनिल

६८. मा.बहल योगेश मंगलसेन

६९. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७०. मा.कदम सदगुरु महादेव

७१. मा.गिता सुशील मंचरकर

७२. मा.कैलास महादेव कदम

७३. मा.छाया जगन्नाथ साबळे

७४. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७५. मा.टाक अरुण मदन

७६. मा.वाघेरे सुनिता राजेश

७७. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७८. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७९. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८०. मा.काळे विमल रमेश

८१. मा.विनोद जयवंत नढे

८२. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८३. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८४. मा.विमलताई सुरेश जगताप

८५. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८६. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

८७. मा.बारणे माया संतोष

८८. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८९. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९०. मा.कलाटे स्वाती मयुर

९१. मा.चौंधे आरती सुरेश

९२. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९४. मा.जवळकर वैशाली राहुल

९५. मा.जगताप राजेंद्र गणपत

९६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९७. मा.जगताप नवनाथ दत्तू

९८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१००. मा.जम सोनाली पोपट

१०१. मा.प्रशांत शितोळे

१०२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०५. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०६. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०७. मा.संजय केशवराव काटे

१०८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१०९. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११०. मा.पाटील सुजित वसंत

१११. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
११२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-महापालिका आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.कडूसकर, मा.माने, मा.खांडकेकर, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.खोसे, मा.इंदलकर-सहा.आयुक्त, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.पठाण, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गद्दूवार, मा.शेख, मा.गायकवाड-कार्यकारी अभियंता, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.शमिम पठाण -** सभा भरविणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर व मा.उपमहापौर हे सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ नगरसेवक मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे यांनी स्विकारावे अशी सूचना मी मांडते.

**मा.शुभांगी बो-हाडे** - मा.शमिम पठाण यांनी मांडलेल्या सूचनेला अनुमोदन देते.

(यानंतर मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

--------

**मा.पीठासीन प्राधिकारी -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) २०६, पिंपरी (अ.जा.) विधानसभा मतदार संघातील स्थलांतरीत,मयत व दुबार मतदारांची गाळणीबाबतची माहिती मा.सर्वसाधारण सभेपुढे अवलोकनार्थ/निदर्शनास आणून देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ९०　　　　　　　　प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.पिठासिन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-------

अ) मा.महापालिका सभा क्रमांक - ४६ दिनांक २०/७/२०१५ व २३/७/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.पिठासिन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्रमांक - ४७ दिनांक २०/८/२०१५ व २५/८/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.पिठासिन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

क) मा.महापालिका सभा क्रमांक - ४९ दिनांक १९/९/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.पिठासिन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सुनिता गवळी, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र. १३२९८ दि३/११/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत ब क्षेत्रिय कार्यालयाचा समावेश होतो ब क्षेत्रिय कार्यालयअंतर्गत प्रभाग क्र.५० मध्ये डांगे चौक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक- ३ सन २०१५-१६ मध्ये पान क्र.१४२ अनु.क्र.६३ वरती "थेरगावमध्ये डांगे चौकात श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याभोवती म्युरल्स करणे तसेच सभोवतालचा परिसर सुशोभिकरण करणे" काम आहे. सदर कामास वास्तुविशारद मे.सचिन शहा अर्थस्केप आर्किटेक्ट यांची नेमणूक केलेली आहे. सदर कामास अंदाजपत्रकीय र.रु.७०,००,०००/- एवढे कमी पडत असल्याने वाढीव कामाची अंदाजपत्रकीय रक्कम घ्यावी लागणार आहे. तरी सदर कामास सुधारित अंदाजपत्रकीय र.रु.२.५० कोटी एवढी घ्यावी लागणार आहे. सदरचा ठराव यापूर्वी मा.स्थायी समिती ठ.क्र.१३०३२ दि.२०/१०/१५ अन्वये झालेला आहे. सदरचे ठरावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - भोसरी येथील आरक्षण क्रं. ४१४ येथे उदयान विकसित करणे" हे काम सध्या चालू असून या कामातील अंतर्गत बाबींमध्ये (सांस्कृतिक हॉल, प्लॉट लेव्हलिंग, कंपाऊंड वॉल इत्यादी.) वाढ होत असल्याने सदर कामाचा एकूण सुधारित खर्च र.रु. ८५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्याऐंशी लाख फक्त) या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उदयान विकसित करणे टप्पा-२ या कामासाठी सन २०१५-१६ च्या मुळ अंदाजपत्रकात पान क्र. ३२४ अ.क्र.१७८ वर र.रु. १,००,००,०००/- (र.रु. एक कोटी)

प्रशासकीय मान्यता आहे. विषयांकित उदयानासाठीच्या वाढीव कामाची व्याप्ती विचारात घेता सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु. ५,००,००,०००/- इतकी खर्च होणे अपेक्षित आहे तरी विषयांकित कामासाठी सुधारीत कामाचे अंदाजपत्रकीय र.रु. ५,००,००,०००/- (र.रु. पाच कोटी) स प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच वॉर्ड क्र. ५० थेरगाव गावठाण येथील जलनि:सारण विषयक कामे करणे व उर्वरित ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणे या कामास मा.महापालिका ठराव क्र. ४७९ दि.२०/०५/२०१४ नुसार रक्कम रु. ६१,१२,५००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. सदरच्या कामामध्ये नागरिकांची मागणी व अत्यावश्यक ठिकाणी काम करणे गरजेचे असल्यामुळे कामात रक्कम रु. १८,८७,५००/- एवढी वाढ होत आहे त्यानुसार पुर्वीची मान्यता रक्कम रुपये = ६१,१२,५००/- + वाढीव रक्कम रुपये = १८,८७,५००/- एकुण सुधारित रक्कम रुपये = ८०,००,०००/- एवढी येत आहे त्या सुधारित रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. ४० खराळवाडी येथील विवीध ठिकाणचे पावसाळी गटर्स (सरफेस गटर्स) करणे कामाचा आदेश मे. ऑटोकॉल सिस्टम्स यांना आदेश क्र. स्था/नि/३क/२७५/२०१५ दि.२५/०९/२०१५ अन्वये देणेत आलेले असून सदरच्या कामाची निविदा रक्कम रु. १३,९९,२१७/- इतकी आहे व निविदा दर ३५.५२ % कमी आहे. तरी सदर कामाची निकड व आवश्यकता पाहता मनपाच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात पान क्र. ४७२ अ.क्र.२२ वरील क प्रभागाअंतर्गत झीरो बॉईज चौक ते खराळवाडी मध्ये जलकुंभ करणेकामी पाईपलाईन टाकणे याकामी असलेली तरतुद र.रु.३,८५,००,०००/- वरील कामास वर्गीकरण करणेस व वरील सुधारीत खर्च र.रु.४,९४,००,०००/- यांस भाववाढ फरकासह मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला मी अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसुचना स्विकारली आहे.

यानंतर उपसुचनेप्रमाणेचा दुरूस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७८२ विषय क्रमांक - १

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सुनिता गवळी, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र. १३२९८ दि३/११/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत ब क्षेत्रिय कार्यालयाचा समावेश होतो ब क्षेत्रिय कार्यालयअंतर्गत प्रभाग क्र.५० मध्ये डांगे चौक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंदाजपत्रक३ सन २०१५-१६ मध्ये पान क्र.१४२ अनु.क्र.६३ वरती “थेरगावमध्ये डांगे चौकात श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याभोवती

म्युरल्स करणे तसेच सभोवतालचा परिसर सुशोभिकरण करणे" काम आहे. सदर कामास वास्तुविशारद मे.सचिन शहा अर्थस्केप आर्किटेक्ट यांची नेमणूक केलेली आहे. सदर कामास अंदाजपत्रकीय र.रु.७०,००,०००/- एवढे कमी पडत असल्याने वाढीव कामाची अंदाजपत्रकीय रक्कम घ्यावी लागणार आहे. तरी सदर कामास सुधारित अंदाजपत्रकीय र.रु.२.५० कोटी एवढी घ्यावी लागणार आहे. सदरचा ठराव यापूर्वी मा.स्थायी समिती ठ.क्र.१३०३२ दि.२०/१०/१५ अन्वये झालेला आहे. सदरचे ठरावास मान्यता देणेत येत आहे. तसेच "भोसरी येथील आरक्षण क्रं. ४१४ येथे उदयान विकसित करणे" हे काम सध्या चालू असून या कामातील अंतर्गत बाबींमध्ये (सांस्कृतिक हॉल, प्लॉट लेव्हलिंग, कंपाऊंड वॉल इत्यादी.) वाढ होत असल्याने सदर कामाचा एकूण सुधारित खर्च ररु.८५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंच्याऐंशी लाख फक्त) या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उदयान विकसित करणे टप्पा-२ या कामासाठी  सन २०१५-१६ च्या मुळ अंदाजपत्रकात पान क्र. ३२४ अ.क्र.१७८ वर र.रु. १,००,००,०००/- (र.रु. एक कोटी) प्रशासकीय मान्यता आहे. विषयांकित उदयानासाठीच्या वाढीव कामाची व्याप्ती विचारात घेता सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.५,००,००,०००/- इतकी खर्च होणे अपेक्षित आहे. तरी विषयांकित कामासाठी सुधारीत कामाचे अंदाजपत्रकीय र.रु. ५,००,००,०००/- (र.रु. पाच कोटी) स प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच वॉर्ड क्र. ५० थेरगाव गावठाण येथील जलनि:सारण विषयक कामे करणे व उर्वरित ठिकाणी जलनि:सारण नलिका टाकणे या कामास मा.महापालिका ठराव क्र. ४७९ दि.२०/०५/२०१४ नुसार रक्कम रु.६१,१२,५००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. सदरच्या कामामध्ये नागरिकांची मागणी व अत्यावश्यक ठिकाणी काम करणे गरजेचे असल्यामुळे कामात रक्कम रू. १८,८७,५००/- एवढी वाढ होत आहे त्यानुसार पुर्वीची मान्यता रक्कम रुपये = ६१,१२,५००/- + वाढीव रक्कम रुपये = १८,८७,५००/- एकुण सुधारित रक्कम रुपये = ८०,००,०००/- एवढी येत आहे त्या सुधारित रक्कमेस  प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ४० खराळवाडी येथील विवीध ठिकाणचे पावसाळी गटर्स (सरफेस गटर्स) करणे कामाचा आदेश मे. ऑटोकॉल सिस्टम्स यांना आदेश क्र. स्था/नि/३क/२७५/२०१५ दि.२५/०९/२०१५ अन्वये देणेत आलेले असून सदरच्या कामाची निविदा रक्कम रु.१३,९९,२१७/- इतकी आहे व निविदा दर ३५.५२ % कमी आहे. तरी सदर कामाची निकड व  आवश्यकता पाहता मनपाच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात पान क्र. ४७२ अ.क्र.२२ वरील क प्रभागाअंतर्गत झीरो बॉईज चौक ते खराळवाडी मध्ये जलकुंभ करणेकामी पाईपलाईन टाकणे याकामी असलेली तरतुद र.रु.३,८५,००,०००/- वरील कामास वर्गीकरण करणेस व वरील सुधारीत खर्च र.रु.४,९४,००,०००/- यांस भाववाढ फरकासह मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/मु.का./१८७/२०१५, दि. ०६/१०/२०१५

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१५ दि.६/११/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाअंतर्गत होणाऱ्या विविध विकास कामाअंतर्गत उर्जाबचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज निविदा कामानुसार खरेदी करून उभारणी केल्या जातात. सदर एल.ई.डी.फिटींग्जची एकत्रितपणे खरेदी केल्यास उत्पादक कंपनींकडून स्पर्धात्मक दर प्राप्त होतील व दर्जात्मक साहित्यही प्राप्त होईल. या करीता विद्युत विभागाकडून एकत्रितपणे आवश्यक एल.ई.डी फिटींग्जची एकत्रित खरेदी करण्यात याव्यात अशा सुचना मा.आयुक्त यांनी केल्या आहेत.

त्यानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालय व उद्यान विभागाकडून सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील "उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे" व " सार्वजनिक सुरक्षितता" आणि "उद्याने" या लेखाशिर्षावरील कामाअंतर्गत एल.ई.डी. फिटींग्जची मागणी व त्याकरीता आवश्यक तरतूदीसह दिलेल्या माहीतीनुसार, सर्व क्षेत्रीय कार्यालय व उद्यान या विभागांकडून केलेल्या मागणीनुसार सदर कामात वेगवेगळ्या क्षमतेचे एल.ई.डी फिटींग्जसाठी खालील नमूदनुसार खर्च अपेक्षित आहे. तर क्षेत्रीय कार्यालय व उद्यान विभागाकडून सदर नमूद लेखाशिर्षांवर एल.ई.डी. फिटींग्जसाठी राखून ठेवलेली उपलब्ध तरतूदीतून सदर खर्च करता येईल.कामांचे वर्गीकरण करतांना प्रपत्र १ ,२ व ३ अन्वये वाढ / घट तक्त्यानुसार करणेत आलेली आहे.

या लेखाशिर्षांतर्गतचे कामांचे अनुषंगाने खालील नमूदनुसार एकूण खरेदीचे ३ स्वतंत्र कामांमध्ये वर्गीकरण केल्यास कामात सुसुत्रता येईल.

| अ. क्र. | सन २०१५-१६ अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष | नव्याने नमूद कामाचे नांव | वर्गीकरण करावयाचे लेखाशिर्ष | वर्गीकरण करावयाची प्रशा.मान्यता | वर्गीकरण करावयाची तरतूद (वाढ - घट तक्त्यानुसार) |
|---|---|---|---|---|---|
| १ | उर्जा बचतीची उपकरणे व | अ, ब, क, ड, ई व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील | उर्जा बचतीची उपकरणे व | ५३०००००० | ४९४२४१०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | स्ट्रीट लाईट नूतनी करण करणे | विभागातील जुन्या सो.व्हे. फिटींग्ज काढून उर्जा बचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे. | | |
| २ | सार्वजनिक सुरक्षितता | अ, ब, क, ड, ई व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील लेखाशिर्षावरील कामांकरीता मागणीनुसार उर्जाबचती कामी मध्यवर्ती भांडारा मार्फत एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | मध्यवर्ती भांडार विद्युत साहित्य खरेदी | १२०००००० | १११९६००० |
| ३ | उद्यान विद्युत | उद्यान/भु.ग.यो./ज.शु.कें. मधील विद्युत कामांकरीता मागणीनुसार उर्जाबचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | उद्यान विद्युत | ४७००००० | ४३५५२०८ |
| | | **एकूण** | | **६९७०००००** | **६४९७५३०८** |

सबब उपरोक्त नमूद प्रमाणे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात "उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे " व " सार्वजनिक सुरक्षितता" आणि "उद्याने" या लेखाशिर्षाअंतर्गत विविध प्रकारच्या एल.ई.डी फिटींग्ज खरेदीकामी उपरोक्त नमूद तीन नविन कामांचा सामावेश करून कामांसाठी लागणारी तरतूद व शिल्लक तरतूद यानुसार वाढ / घट तक्त्यानुसार (प्रपत्र १ २ व ३) नमूद लेखाशिर्षानिहाय वर्गीकरण करणेस व त्याकरीताच्या कामास व खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, विषय क्र.२ आत्ता सांगितल्याप्रमाणे सर्व क्षेत्रीय कार्यालये, विभागांची मागणी एकत्र करुन एल.ई.डी दिव्यांची खरेदी करणार आहेत. मूळ मुद्दा खरेदीचा आहे. विषय काहीही असलातरी तुम्ही येण्यापूर्वी विद्युत विभागाकडे सर्व विद्युत केबल भूमिगतकरायचे खूप मोठे काम होते. १९९७ च्या डिसेंबरमध्ये माझ्याच काळात या कामाची सुरुवात झाली. या कामाला चिंचवडमध्ये पहिली सुरुवात झाली. नंतर संपूर्ण शहरात हे काम सुरु झाले हे काम त्यांचे हातून गेले. विद्युत विभागात आता तसे काही काम राहिलेले नाही. म्हणून प्रभागनिहाय यांनी सगळे बजेट एकत्रित करायचे हा यांनी घाट घातलेला आहे. आपण आत्ताच २०/१०/१५ ची मिटींग संपवली यात हा विषय होता. एका जबाबदार अधिका-याने येऊन सांगीतले की, आम्ही आयुक्तांकडून विषय आणतोय. तुम्ही हा विषय फेटाळा. आत्ताच विषय फेटाळलेला आहे. आपल्या सभागृहात एका मिटींगला हा विषय फेटाळण्यात येतो. एका अक्षराचा सुद्धा फरक नाही. आणि लगेच तासाभराने जी महापालिका सभा होते. आत्ता तो विषय मंजूर करतोय. तो विषय मांडायची इतकी घाई कशाला झालेली आहे. दि.१२/९/२०१५ च्या मा.महापालिका सभेपुढे सदस्यांनी विषय

मांडला. तो विषय दि.२०/१०/१५ ला फेटाळलेला आहे. थोडाही विलंब न करता दि.२०/१०/१५ ला मा.विधी समितीकडे प्रस्ताव आला. दि.६/११/१५ ला मा.विधी समितीत विषय मंजूर झाला का नाही त्याचे मिनिटस् आमच्याकडे आलेले नाहीत परंतू दि.२०/१०/१५ च्या मिटींगला त्यांनी विषय तातडीने कसा आणला ते माहित नाही. हा विषय विधी समितीकडे सुद्धा जातो आहे. स्थायी समितीत विषय मंजूर होतो आहे. विषय एका मिटींगमध्ये फेटाळून लावतोय. लगेचच होणा-या दुस-या मिटींगमध्ये तो विषय मंजूर होतो आहे. काय गौडबंगाल आहे ते कळत नाही. परंतू एवढे मात्र खरे की, या सभागृहाचे पावित्र्य आपल्याकडून राखले जात नाही असे वाटते. कारण सन्मा.सभासदांनी स्थायी समितीत दिलेला विषय तुम्ही फेटाळून लावताय हे अत्यंत चुकीचे आहे. सदस्यांनी विषय आणलातर फेटाळून लावायचा. त्याची कोणती माहिती द्यायची तसदी अधिका-यांनी घ्यायची नाही. माहिती सभागृहापुढे द्यायची नाही कारण तसा तुम्हाला कायद्याने बंधनकारक नाही. पण आपण मात्र तोच विषय प्रशासनाकडून आला. एकंदरीत स्वतः आणत नाही. प्रशासनाने तो विषय आपल्यासमोर मांडला की, तुम्ही संपूर्ण तयारीनिशी सज्ज असता. बरेच वेळा विषय मंजूर करुन घेता. असा सगळा गोंधळ करुन हा विषय आणला आहे. यात विषय आणला असलातरी विषय एलईडीचा आहे. गोंधळाचा विभाग आहे. याचसाठी रु.६,४९,७५,३०८/- चा विषय आहे. तत्पूर्वी मी सन्मा.सभागृह नेत्यांन सांगू इच्छिते की, दि.२५/८/१५ च्या मिटींगला नगरसदस्य मा.नारायण बहिरवाडे यांनी आपल्याच वॉर्डातली तरतूद वर्ग केलेली आहे. रु.५ कोटी एलईडीसाठी दिले. आणि आत्ता रु.६.४६ लाखांचा विषय आहे. माझ्याकडे ठराव क्रमांक १२०८५ दि.४/८/२००५ चा ठराव आहे. हा ठराव मी तुम्हाला वाचून दाखवते. या ठरावातील गौडबंगाल आहे की, आत्ता तुम्ही रु.१ कोटींची का होईना परवानगी द्या. आम्ही त्या ठरावाच्या अनुषंगाने आत्ता तरतूद वर्ग करु. खरेतर यात दोन कामे आहेत. मा.विधी समितीकडून मा.महापालिका सभेकडे विषय यायला हवा. तसे न करता वर्गीकरणाचा विषय व प्रशासकीय मान्यतेचा विषय दोन्ही विषय एकत्र दिले होते ही खूप मोठी चूक आहे तसे देता येता का बघा. दोन्ही विषय एकत्रित आले आहेत. यात मी असे सांगते आहे की, तुम्ही कितीही कोटींच्या खरेदीला मान्यता द्या. तुम्हाला माहित सुद्धा होणार नाही. आत्ता समजा एक कोटींचा मान्यता दिली तरी परस्पर त्यावर वाढीव ऑर्डर देऊन या सगळ्या खरेद्या वर्षभर चालू राहतील. या विषयाच्या अनुषंगाने कित्येक कोटींची खरेदी होईल. यावर तुम्ही नजर ठेवली पाहीजे. विविध प्रकारच्या एलईडी फिटींग पुरविणे असा हा विषय आहे. म्हणजे फक्त फिटींगचा पुरवठा करणे अशा विषय, माझ्याकडे टेंडर नोटीस वगैरे आहे. यातून प्रश्न उपस्थित होतो, बसवायचे कोणी. तुम्ही संपूर्ण एकत्रित खरेदी कराल. आत्ता खरेतर मा.पक्षनेत्यांचे आभार मानते की, त्यांनी काही रक्कम वजा केलेली आहे. त्यामुळे एवढी मोठी खरेदी त्यातून होणार नाही. समजा एवढी मोठी खरेदी झालीतर ती एकत्रित करता येणार आहे. हे सर्व साहित्य कुठे ठेवणार आहोत. बंड साहेबांच्या काळात अशीच खरेदी झाली होती. भांडार

विभागात कित्येक लाखांच्या किंवा कोटींच्या केबल पडून आहेत. या आपल्याला काही उपयोग करता येतो का ते एकदा पहा. तशाच या केबलसुद्धा फिटींगशिवाय पडून राहणार आहेत. विशेष म्हणजे भांडार विभागाकडे जी तरतूद होती त्याच्या खरेदीचे टेंडर आधीच काढले आहे. मी सभागृहाला सांगते, मी सन्मा.अधिका-यांना विचारले, ते म्हणाले, हे आमच्याकडून नाही, भांडार विभागाकडून हे टेंडर काढले आहे. टेंडर आधीच काढून झाले आहे. हा विषय कंम्पल्सरी सभागृहापुढे आला आहे. खरेतर भांडार विभागामध्ये खरेदी लवकर होत नाही. मी तुम्हाला आत्ताच सांगितले. सन्मा.दिलीप गावडे साहेब आहेत. त्यांना भांडार विभागाचा चार्ज दिला आहे. भांडार विभागातून काय लवकर मिळते. आपण सगळे अधिकारी पेपर वाचत असतील, सभागृहातील सन्मा.सदस्य पेपर वाचत असतील, लहान-लहान मुले आत्ता थंडीच्या दिवसांत सुद्धा फरशीवर बसतात. त्यांनी टेंडर काढून किती महिने झाले. साहेब, तुम्ही माहिती काढलीत का. त्यांना अजूनही बेंच का मिळाले नाहीत. हा भांडार विभाग काय करतोय. मी काल नगरसचिव कार्यालयात गेले होते. मा.नगरसचिव यांना विचारले, मागील ठरावांच्या काही प्रती द्या. त्यावेळी त्यांनी सांगितले, याठिकाणची झेरॉक्स मशीन बिघडली आहे. झेरॉक्सचं जास्त काम तिथे असेलतर तुम्हाला त्वरित देता येत नाही का. भांडार विभागाकडून प्रत्येक गोष्टीच्या खरेदीला उशीर लागतो. मग ही खरेदी एवढी लवकर एवढी फास्ट कशी झाली. भांडार विभागाकडून त्या फिटींग वेळेवर मिळल्यातरी त्या घेऊन जाताना ते लोखंडी साहित्य नाही. एलईडी बल्ब घेऊन जाणार आहात. त्याची तूटफूट विद्युत विभागाने स्पष्ट करायची आहे. त्या काळातल्या केबल अजूनही का पडलेल्या आहेत. आवश्यकता नव्हती तर का मागवल्या. तसेच एलईडी बल्ब याचे तसेच करणार आहात का. एलईडी बल्ब पाहिजेत. यामुळे ऊर्जा बचत होणार आहे त्याबद्दल दुमत नाही. प्रभागांकडून मोठ्या प्रमाणावर खरेदी होते आहे. त्यावेळी सुरुवातीपासून ठरवलेले आहे. नोव्हेंबर महिना आला की आमच्याकडे सन २०१६-१७ च्या वृक्ष प्राधिकरणाचे बजेट आलेले आहे. अधिका-यांची पुढील बजेटची सगळी तयारी सुरु झाली आहे. असे असताना मागील नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये जेव्हा पुढील बजेटची तयारी सुरु होती, त्यावेळी अधिका-यांनी सांगितले होते, आपण केंद्र सरकारकडून एनर्जी डिफिसियन्सी सर्वीसेस लिमिटेड या कंपनीकडून एलईडी खरेदी करणार आहोत. बजेटमध्ये काही एस्टीमेट करु नका. त्यामुळे त्यांनी आत्तापर्यंत तरतूद केली नाही. तरतूद यांनी केली. मागील वर्षी सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये पूर्वीचे बल्ब बदलून एलईडी बसवायचा निर्णय झाला आहे. याची आत्ता खरेदीनंतर सगळी यंत्रणा ते कधी करणार होते. तिथे एलईडी कधी लागणार आहेत. त्यापेक्षा मोठ्या प्रमाणात खरेदी होते आहे. कशासाठी अडवले. हे तुमच्या नावाखाली, आयुक्तांनी सांगितले, या नावाखाली सगळा कारभार चालला आहे. सगळी फिटींग बसवली तरी त्यांनी सांगितले ५ वर्षांची गॅरंटी आहे. मला वाटते हे चांगले आहे. ते स्टँम्पवर लिहून घेणार आहोत त्यांना आत्ता फक्त ६० टक्केच रक्कम द्या. उर्वरीत ४० टक्के रक्कम, १०/१० टक्के प्रत्येक वर्षानंतर द्या. बघू

कोणती एजन्सी काम करते. आपण जे बल्ब घेणार आहोत ते सगळे चायनामेडच आहेत. टेंडर नोटीसमध्ये एवढ्या कंपन्यांची नावे दिलेलीच आहेत. २०/३० टक्के बीलो याने काही फरक पडत नाही. त्यापेक्षा त्यांना कित्येक पटींनी कमी मिळते आहे. त्यामुळे याची गॅरंटी घेऊन काय करायचे आहे. दुरुस्ती करायला किती लोक आपल्याकडे ठेवणार आहेत प्रभागनिहाय असेल तर तेवढे लोक दुरुस्तीला असणार आहेत का, हा सगळा सावळा गोंधळ आहे. त्यामुळे एकत्रित खरेदी खरेतर चुकीची आहे. प्रभागाकडून टेंडर काढले तरी ते बल्ब बंद पडले. २/४ लोक असतात. त्या-त्या प्रमाणे लगेचच दुरुस्ती करुन देत असतात. ज्या कंपन्या आहेत, त्यांची मी माहिती घेतली. ही जी एजन्सी आहे. अशी खरेदी पुणे महापालिकेने एकत्रित केली. त्यांना हजारो बल्ब टाकून द्यावे लागलेले आहेत. विजयवाडा, मुंबई, ठाणे, नवी मुंबई इथे सगळीकडे एकत्रित खरेदी फसलेली आहे. नाशिकमध्ये तर केस हायकोर्टात गेली आहे. असे असताना आपण तेच इथे राबवतोय. प्रभागाला खरेदी करु द्या. जर संपूर्ण खरेदी करायची असेलतर फक्त ६० टक्के रक्कम सुरुवातीला मिळेल, १० टक्के रक्कम देण्यात येईल. असे असेलतर त्यांना देऊ द्या. काय नुकसान व्हायचे असेलतर ते होऊ द्या. जर आपण प्रभागात एकत्रित खरेदी करणार नसू तर प्रभागांना एलईडी खरेदीचे टेंडर काढायच्या ऑर्डर त्वरित द्याव्यात असे सांगते. तुम्ही पुन्हा एकदा या विभागाकडे थोडेसे लक्ष द्यावे त्यांच्या या गौडबंगालामध्ये हे खूप प्रसिद्ध आहेत. विद्युत विभाग भूमिगत केबलसाठी प्रसिद्ध आहे. त्यांचे कारनामे झळकलेले आहेत. कोर्टात अनेक जण आहेत. याकडे तुम्ही विशेष लक्ष द्यावे. तुम्ही यांच्या जाळ्यात फसू नका व एकत्रित खरेदी करु नका अशी याठिकाणी विनंती करते.

**मा.प्रतिभा भालेराव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, तुम्ही महापौर झाल्याबद्दल तुम्हाला सदिच्छा देते. तुमची इच्छा आज पूर्ण झाली आहे. माझा या विषयाला विरोध नाही. तरीसुद्धा विषय क्र.२ मध्ये सन २०१५-१६ साठी **उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनी करण करणे, सार्वजनिक सुरक्षितता, विद्युत कामांकरीता मागणीनुसार उर्जाबचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे** यासाठी कोट्यावधी रुपयांची तरतूद केली आहे. हे सर्व करत असताना गार्डन नक्की कोणासाठी विकसित करतात. नागरीकांसाठी, ठेकेदारांसाठी का अधिका-यांसाठी. मा. आयुक्त साहेब, नक्की कोणासाठी काम चालू आहे याचा विचार करावा. माझ्या असे निदर्शनास आले आहे की, आम्हाला इथला एका उद्यान कामाचा अनुभव अजिबात नसताना चार महिन्यांपूर्वी दीड एकरचे गार्डन ठेकेदाराला दिले होते. तरीसुद्धा दक्षता समितीचा अहवाल आणला होता त्याचे काय झाले. मला तुम्हाला सूचवावयाचे आहे की, हे ठेकेदार राजरोसपणे महापालिकेला लूटत आहेत, त्यांची ही लूटबाजी बंद करावी. व अशा ठेकेदारांना काळ्या यादीत समाविष्ट करावे अशी विनंती आहे. काल आमची क्षेत्रिय सभा झाली होती. क्षेत्रिय सभा होत असताना नागरीकांची मागणी आहे की, एका भागाला एकवेळ पाणी,

एका भागाला दोन वेळ पाणी मिळते. आमच्या भागाला एक वेळ पाणी द्या पण प्रेशरने द्या म्हणजे सर्वांचीच सोय होईल. आणि पाणी पुरवठ्याची बचत होईल ही विनंती आहे.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, भोसरी संघातील दोन महापौर आम्हाला बघायला मिळाले म्हणून मा.वसंत (नाना) लोंढे व मा.तानाजी खाडे या दोघांचे शहराच्या वतीने व माझ्या वतीने अभिनंदन करतो. मा.आयुक्त साहेब, मला या विषयासंदर्भात थोडी माहिती हवी आहे. आपण शहरात आत्तापर्यंत ज्या स्ट्रीट लाईटस् बसविलेल्या आहेत, त्या संदर्भात सेव्हींग एनर्जी हा विषय आणला आहे. आपल्याला मला एक साधा प्रश्न विचारायचा आहे की, सेव्हींग एनर्जीमध्ये आत्तापर्यंत ज्या ट्युबज् होत्या, हायमास्क लाईटस् होत्या, वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या लाईटस् आलेल्या आहेत त्या बदललेल्या आहेत. त्यापूर्वीच्या लाईटचे रिडींग मीटर रेटने पूर्वीच्या एमएसईबीने किंवा महापालिकेने याचे रिडींग केले होते. हा माझा प्रश्न आहे. ही सेव्हींग एनर्जी आपण म्हणताय. या पूर्वीच्या लाईटस् मुळे आपले किती सेव्हींग झाले आहे याचे ऑन पेपर रेकॉर्ड आपल्याकडे आहे का. हे कोणाच्या हितासाठी, कोणाच्या स्वार्थासाठी, कोणाला काळाबाजार करण्यासाठी हा विषय आला आहे का. आत्ता जसे मा.शमिम पठाणताई यांनी सांगितले. पहिल्या सभेत हा विषय फेटाळून लावतोय व दुसऱ्या मिटींगला तोच विषय सभागृहामध्ये मंजूर होतो आहे हा मला एक प्रश्न पडलेला आहे. यापूर्वी ज्या-ज्या लाईटस् आम्ही बघतोय आम्ही लोकांना सांगतोय, पिवळ्या रंगाच्या आता पांढ-या ट्यूब झाल्या आहेत. चार ट्यूब आल्या. त्याच्या पूर्वीची परिस्थिती, जे-जे ठेकेदार आले. दुसरा प्रश्न असा आहे की, पूर्वी ज्या पिवळ्या ट्यूबलाईटस् होत्या, त्याचे मेंटेनन्स कोणाकडे होते. आमच्या भागात आत्तापर्यंत किती ट्यूबज् रिपेअर झाल्या. त्याच्या रिपेअरींगसाठी सुद्धा आपल्याकडे मटेरीयल नाही ही वस्तुस्थिती आपल्यासमक्ष मांडतोय. या पूर्वी ज्या-ज्या फिटींग्ज् बसवल्या सभागृहात मंजूरी करुन घेतल्या, हे करणार ते करणार. पूर्वी असाच समज करुन मंजुऱ्या करुन घेतल्या. आज हिच वस्तुस्थिती असणार आहे. तुम्हाला माहिती नसेल तर सांगतो, पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये एमएसईबीची जेवढी ऑफिसेस आहेत, त्याठिकाणी शासनाने एक स्टॉल लावलेला आहे. जे एलईडी बल्बज् आहेत त्याची किंमत रु४००/- होती. आत्ता रु.१००/- रुपयात आयडेन्टीफिकेशन दाखवले तर जवळपास ३०० टक्के रेट कमी करुन एलईडी लाईटस् घरगुती वापरासाठी द्यायला लागले आहेत. मला हे कळत नाही की, हा विषय आणण्यापाठीमागे उद्देश्य काय आहे? माझ्या या तीन प्रश्नांची उत्तरे द्यावीत. नंतर मला बोलायची संधी द्यावी. आपण हे बीओटी तत्वावर देणार होतो. त्याचे मेंटेनन्स करणार आहोत. मग याचा मेंटेनन्स कोण करणार आहे. आत्तापर्यंतचा आपला इतिहास आहे की, जो-जो कॉन्ट्रॅक्टर काम करुन घेतो, त्याच्या पाठीमागील पार्श्वभूमी बघितली तर ठेकेदाराला एकदा पैसे दिले की तो पाठिमागे वळून बघत नाही. आपले अधिकारीसुद्धा तु हे का केले नाही असा प्रश्न करत नाहीत असे आपण कधी

करत नाही. म्हणून आयुक्त साहेब, माझ्या ३ प्रश्नांची उत्तरे द्यावीत. त्यानंतर मला बोलायचे आहे.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आत्ता आपल्या लक्षात आणून द्यायचे आहे की, हा विषय दप्तरी दाखल झाला आहे. जरी दप्तरी दाखल झाला असेल तर या विषयावर चर्चा करता येते का. मग आपण या विषयावर चर्चा का करतोय. दोन्ही विषय वेगवेगळे आहेत का. विषय तर सेम आहेत. ज्यावेळी मा.शमिम पठाणताईंनी सांगितले होते की, हा विषय तहकूब झाला आहे, तुमच्या लक्षात आणून दिले होते. त्यावेळी तुम्ही हा विषय घ्यायला पाहिजे नको होता. मा.नगरसचिव यांनी उत्तर द्यावे.

**मा.नगरसचिव**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, हा विषय मागील कार्यपत्रिकेवर मा.आयुक्त यांच्या विषयपत्रिकेद्वारे मा.विधी समितीसमोर आला होता. मा.विधी समितीने मान्य केल्याप्रमाणे हा विषय मी आपल्यासमोर निर्णयासाठी सादर केला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची प्रकरण २ नियम क्र.१ र प्रमाणे, एकदा विषयावर निर्णय घेतल्यानंतर, विषय दप्तरी दाखल केल्यानंतर, तीन महीन्यांपर्यंत तो विषय आणता येणार नाही. तथापि, सभागृहाने ५० टक्के पेक्षा जास्त बहुमताने मान्यता दिलीतर त्या ठरावात बदल करण्याचे अधिकार मा.सभागृहाला आहेत.

**मा.सुलभा ऊबाळे** - मा.नगरसचिव हे तुम्ही आधी सांगायला पाहिजे होते. तुम्ही आधी सांगीतले का नाही.

**मा.आर.एस.कुमार** - मा.नगरसचिव हे तुम्ही आधी सांगायला पाहीजे होते.

**मा.नगरसचिव**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.विधी समितीने मंजूर केलेला विषय सभागृहासमोर निर्णयासाठी ठेवलेला आहे.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, तुम्ही गल्लत करु नका. विषय सेम आहे. तुम्ही नियमाप्रमाणे आत्ता नियम वाचून दाखवला. महापौरांनी ५० टक्के पेक्षा बहुमत घ्यायला पाहिजे होते

**मा.नगरसचिव** - मा.सभागृह याबाबतीत निर्णय घेईल.

**मा.सुलभा ऊबाळे** - हे तुम्ही सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायला पाहीजे होते.

**मा.आर.एस.कुमार**-तुम्ही चुकीचा मॅटर करु नका. असा विषय महापौरांनी सभागृहाला विचारल्याशिवाय सभागृहात परत चर्चेला आणू शकत नाही हा विषय दप्तरी दाखल व्हायला पाहिजे. तुम्हाला चर्चाच करायची असेलतर मा.महापौर यांनी सभागृहाची परवानगी घ्यावी नंतर तुम्ही या विषयावर चर्चा करायला परवानगी द्या.

**मा.सुलभा ऊबाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मा.शमिम पठाण ताई तुम्हीच हा विषय काढला. तुम्हीच सर्वांच्या लक्षात आणून दिले आणि आता तुम्हीच म्हणताय जाऊ द्या, जाऊ द्या म्हणजे याचा अर्थ काय. एका अर्थाने सभागृहाची दिशाभूल झाली हे

तुम्ही लक्षात आणून दिले. तुम्ही सिनिअर असल्याचा फायदा झाला. आत्ता जाऊ द्या म्हणताय.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, आत्ता कुमार साहेबांनी स्पष्टीकरण दिले तसे मी म्हणत होते.

**मा.सुलभा ऊबाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,पठाणताई दरवेळी ज्या गावाला जायचे आहे त्याचा पत्ता सांगत नाहीत. दुस-याच गावाचा पत्ता सांगतात आणि दुसरीकडेच नेऊन सोडतात. याठिकाणी ही चर्चा झालेली आहे. हा विषय जाऊ दे. या विषयपत्रिकेवर हा विषय आहे. महाराष्ट्र शासन, केंद्र शासनानेसुद्धा हा विषय जोरात हातात घेतलेला आहे. त्याप्रमाणात आपल्या महापालिकेत एलईडी लाईटस् बसवाव्यात असा विषय आला आहे परंतू जेव्हा विषय संशयास्पद पद्धतीने येतो, त्यावेळी निश्चितपणे सर्व नगरसेवक असतील, नागरीक असतील, सर्वांच्या मनात शंकेची पाल चुकचुकल्याशिवाय रहात नाही. ही पाल चुकचुकली आहे व नंतर चुकचुकली नाही का आत्ता चुकचुकली पण पाल चुकचुकली आहे मा.महापौर साहेब, ही एलईडी म्हणजे इलेक्ट्रीकल पार्ट आहे का चोकचा बल्ब आहे. या एलईडीला कॅपॅसिटर असतात, आय.सी. असतात, कंडेन्सर्स असतात. याचे ज्ञान महापालिकेतील किती इंजिनिअर्स यांना आहे याचापण खुलासा मा.तुपे साहेब यांनी केला पाहिजे. ज्यावेळी आपण हे टेस्टट्युब बेबीसारखे आणतो. तेव्हा याची काळजी कशी घ्यायची. याचे जाणकार पाहिजेत. आपण पालक आहोत मग आपल्याला याची किती माहिती आहे याचे सुद्धा उत्तर या सभागृहाला मिळणे गरजेचे आहे. जसे आत्ता मा.दत्ताकाका साने यांनी सांगितले की, कोणतीही गोष्ट ५ वर्षांच्या वॉरंटीने आली की तिथपर्यंतच. मागील वर्षी आपण शिलाई मशीन्स घेतल्या होत्या. तेव्हा म्हटले होते की, सगळ्या महिलांना मशीन चालवायचे शिकवायला प्रशिक्षण देणार. त्या मशिन्स चायनामेड होत्या. पहिल्याच दिवशी प्रॅक्टीस करताना त्या मशिनची निडल तुटली. ती निडल बाजारात कुठेही मिळाली नाही. त्यामुळे त्या मशिन्स तशाच पडून राहील्या. म्हणजे आपण खरेदी करताना खूप काही चांगले सांगतो. पण त्यांच्यावर काहीही कारवाई होत नाही. पाच वर्षांची गॅरंटी, वॉरंटी याचा सुद्धा व्यवस्थित खुलासा झाला पाहिजे ते कोण करणार आहे. आपल्या अधिका-यांना याचे किती ज्ञान आहे. आज उल्हासनगरमध्ये एलईडी बल्ब कुठेतरी झोपडपट्टीत तयार होतात. दहा हजाराचे कोटेशन आले, आम्हाला तेच दोन हजाराला मिळालेतर याचा खुलासा कोण करणार. याची वसूली करेपर्यंत ते अधिकारी रिटायर्ड होतील मग परत कोर्टात जावे लागेल. मग वसूली कोणाकडून कराल. साहेब, तुम्ही दुसऱ्या गावाला जाल. आम्ही काय करायचे. यात निश्चितपणे खूप पारदर्शकता असली पाहिजे. एमएसईबीकडे रु.१००/- ला बल्ब मिळतो, तोच बाजारात रु.४००/- रेट आहे. याचा अर्थ या बल्बचा मॅन्युफॅक्चरींग रेट रु.१००/- पेक्षा जास्त नाही. आपल्याकडे किती इंजिनिअर्स नॉलेजेबल आहेत याचा खुलासा, वॉरंटी ६० टक्के, ४० टक्के असा करणार आहोत का, महत्वाचे म्हणजे यात समानता असली पाहिजे.

एकाच वॉर्डात एलईडी लागतील, ४/५ कोटींचा विषय आहे. कोणाच्या वॉर्डात किती कोटींचे बल्ब लागणार हा विषय नाही. शहराचे लाईट बील वाचवायचे आहे हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. महापालिका एमएसईबीचे शंभर कोटींपेक्षा जास्त बील भरते आहे. यात किती सुधार होणार आहे याचा खुलासा झाला पाहिजे. किती सुधारणार, किती कमी होणार याचा सुद्धा खुलासा झाला पाहिजे. याचा खुलासा झाल्यानंतर आम्हाला काही प्रश्न वाटले तर आम्हाला पुन्हा बोलायची संधी द्यावीत ही विनंती.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, कायद्याप्रमाणे सभा चालत नाही. मी एवढेच पॉईंट आऊट केले. भांडार/कोठार विभाग हा कोट्यावधी रुपयांच्या खेळाचा विभाग आहे. प्रत्येक विभाग त्यांची खरेदी का करु शकत नाही. कोठारात काम करणा-या अधिका-याला टेक्निकल नॉलेज नसते. तिथे सगळे ॲडमिनिस्ट्रेशनचे साहेब आहेत. खरेदी ते करतात व त्या-त्या विभागातील अधिकारी स्पेसिफिकेशन देतात. भांडार विभागातील अधिका-यांना विचारायला गेलोतर ते म्हणतात, आम्हाला माहित नाही. आम्हाला विभागांकडून जसे स्पेसिफिकेशन आले आहे, त्याप्रमाणे आम्ही खरेदी करतो. यामध्ये भ्रष्टाचार होतो आहे. इलेक्ट्रीकल विभाग, कम्प्यूटर विभाग स्वतंत्र खरेदी करु शकत नाही का. आरोग्य विभाग त्यांची खरेदी करु शकत नाही का. सहआयुक्त यांना कम्प्यूटर टेंडरबद्दल माहिती विचारली तर ते म्हणाले, आम्हाला स्पेसिफिकेशन माहित नाही. कम्प्यूटर विभाग जसे स्पेसिफिकेशन देतो त्याप्रमाणे आम्ही खरेदी करतो. कम्प्यूटर विभागाला विचारले तर ते म्हणाले, आम्ही खरेदी करत नाही. कोठार विभाग खरेदी करतो. टेंडरमध्ये किती भ्रष्टाचार चालतो. ३ कोटींच्या टेंडरमध्ये ३ कोटींची इन्स्टॉलमेंट पाहिजे म्हणून टर्मस् दाखवतात. ३ कोटींची इन्स्टॉलमेंट कशाला पाहिजे. टेंडर झाल्यानंतर टेंडर डिजाईन करायला एकत्र बसले व त्यांनी ३ कोटी कमी केले. हे म्हणजे ५० इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर्स मारून एका इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टरला डोळ्यासमोर ठेवून खरेदी करण्यासाठी हे चालले आहे. कोणी खरेदी का करु शकत नाही. तुम्ही जे टेंडर काढणार, हे सुद्धा ते टेंडर काढणार. मग तुम्ही कोणाला डोळ्यासमोर ठेवून टेंडर काढणार आहात. हे तरी कबूल करा. ५० लोक यात सहभागी होतात. प्रभागातून टेंडर काढले असतेतर अनेक ठेकेदारांना यातून काम मिळाले असते. ही पद्धत चुकीची आहे. मी या विषयावर अनेक वेळा बोललो आहे. कोठार विभाग डिमॉलिश करा. आपल्याकडे कोठार विभाग नको आहे. या विभागात खूप भ्रष्टाचार चालू आहे मी गावडे साहेबांबद्दल बोलत नाही. त्यांनी या विभागाचा चार्ज आत्ताच घेतला आहे. कमी मटेरियलमध्ये रु.७०/- ते ८०/- रुपयांची वस्तू खरेदी करतो. उदा. पेपर खरेदी करण्यासाठी टेंडर काढले. त्याचा रेट पाहिला, त्याच्या खोलात गेलोतर मला माहिती मिळाली की, पाच लाखाचा पेपर सप्लाय करायचा असेलतर अडीच लाखांची खरेदी करत आहेत. ३६ लाखांचे बील करायचे असेलतर १८ लाखांचेच मटेरीयल येते. कम्प्यूटर विभागाकडून महापौर कार्यालय व आयुक्त कक्ष यांना लॅन दिसते. बाकी ठिकाणी लॅन दिसत

नाही. शनिवार, रविवार सुट्टी होती. शुक्रवारी कम्प्युटर विभागातील सगळे पावणे सहानंतर घरी गेले. सुट्टीनंतर सोमवारी आल्यानंतर मी त्यांना विचारले तर ते म्हणाले की, सगळीकडे लॅन सेपरेट देतो आहोत. अशा अनेक केसेस माझ्या डोळ्यासमोर आहेत. मा.महापौर साहेब, कोठार विभाग डिमॉलिश करा. त्या-त्या विभागाकडून खरेदी करुन घ्या म्हणजे भ्रष्टाचार कमी होईल अशी माझी विनंती आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा एलईडीचा विषय आहे. आपल्या वीज बीलामध्ये बचत होणार आहे. ज्यावेळेस आमच्या भागात स्ट्रीटलाईट पोल उभारण्यात आले त्यावेळेस ते जवळपास ३० मी. ते ४० मी. अंतरावर उभारण्यात आलेले आहेत. त्याची उंची १२ मी. आहे. जागेचे अंतर आणि उंची व दुसरे म्हणजे त्या सोडीयम व्हेपरला जे कव्हर असते आणि हवेमधील अर्द्रता, खालून कोटींग आहे त्यामुळे रस्त्यावर लाईट पडत नाही. विशेषत: आमच्याकडे ग्रामीण भागातील रस्त्याने फिरल्यास तुम्हांला हे दिसेल. आजची परिस्थिती अशी आहे की त्याचा उजेड पडत नाही. काही ठिकाणी सीसीटीव्ही मध्ये फुटेज चांगले दिसते म्हणून एलईडी लावणे गरजेचे आहे. आमच्या भागाची परिस्थिती अशी आहे. शहरातही अशीच परिस्थिती असणार आहे. २५ मी. अंतरावर पोल बसविलेतर त्याठिकाणी उजेड पडेल. आपण वेगवेगळया राज्याचे एलईडी लावणार आहोत त्यानुसार एलईडी बल्बची खरेदी आहे का. भांडार विभागा विषयी बरेचजण बोलले. तीन महिन्यापुर्वी प्रभागामध्ये आम्हांला स्टेशनरी शॉर्टेजमुळे आरोग्य अधिकारी झेरॉक्स देवू शकले नाहीत, तरी एलईडीच्या बाबतीत असे घडू नये. आरोग्य अधिकारी दाते हे देवू शकले नाहीत. त्यांना बकेट वाटप किती झाल्यात त्याच्या प्रती दया असे विचारलेतर कारण सांगीतले झेरॉक्सचा पेपर नाही. हे भांडार पुरवत, तेथे काही टेक्निकल नॉलेज लागतं. विदयूत विभागामध्ये काचेच्या वस्तु असतात त्या व्यवस्थित हॅण्डल केल्या पाहिजेत. आजही भांडार विभागा मार्फत जे साहित्य प्रभागाला पुरविण्यात येते ते प्रभागाला मागणीनुसार देण्यापेक्षा आवश्यकतेनुसार कुठे कुठे बसवणे गरजेचे आहे ते महत्वाचे आहे. काही ठिकाणी टयुब लावल्या त्याला सात वर्षाची वॉरंटी आहे त्याचा रस्त्यावर प्रकाश पडत नाही अशी स्थिती आहे. आता पाच वर्षाचेही आहे, तीन वर्षानंतर त्याची जी काही प्रकाश क्षमता आहे ती वीक होईल. त्याबाबतीत आज बोलता येणार नाही, त्यातील आम्हांलाही जास्तीची माहिती नाही. सर्वात महत्वाचा विषय म्हणजे हे वेगवेगळया एजन्सीला देणार आहेत. ते कोणत्या फिडरवर कोणत्या एजन्सीने काम केले हे शोधणे अवघड आहे. एखादा बल्ब बंद पडलातर तो माझा नाही तो त्याचा आहे तो याचा आहे असे म्हणत म्हणत आठ दहा दिवस जाणार व त्याठिकाणी अंधारच राहणार. भांडार विभागामार्फत खरेदी केलीतर एजन्सी सुध्दा अशा नेमा की त्या पर्टिक्यूलर फिडरला लावल्यातर त्या पध्दतीने तुम्ही नोंदी ठेवाव्यात त्यामुळे मेन्टेनन्सला सोपे जाईल. परंतु एलईडीचा हा विषय खरेदी करणे किंवा

प्रभागामार्फत अगोदर खरेदी न करता त्याला उशिर झालेला आहे आता येथून पुढे उशिर होऊ नये म्हणून हा विषय मंजूर करणे गरजेचे आहे अशी विनंती करतो, धन्यवाद.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एलईडीचा विषय याठिकाणी चर्चेला आलेला आहे. एलईडी हा वाद वेगळा आहे. हा विषय मागच्या मिटींगला तहकूब झाला आता करायचे काय? हे मतदानाच्या रुपाने त्याठिकाणी होईल पण एलईडी संदर्भात बोलायच झालंतर फक्त आपला देश नाहीतर इन्टरनॅशनल लेव्हलवर एलईडीला मान्यता आलेली आहे. वीजेची बचत आणि पाण्याची बचत हे आपल्या देशातच नाहीतर इन्टरनॅशनल लेव्हलवर ती काळाची गरजच झालेली आहे. वॉर्डाच्या परिस्थितीनुसार प्रत्येक ठिकाणी प्रत्येक नगरसेवकांना असे वाटते की, आपल्या वॉर्डात लाईट लागली पाहिजे. नागरीकांना चांगला प्रकाश मिळाला पाहिजे ही प्रत्येकाचीच अपेक्षा असते. म्हेत्रे साहेबांनी याठिकाणी आपल मनोगत व्यक्त केलं. टेक्निकल ज्यांना ज्ञान आहे त्या माणसानीच हया गोष्टी करायला पाहिजे. भांडार विभागाची सभागृहात नेहमीच तक्रार होते नेहमी भांडाराच्या माध्यमातून खरेदी होते, मग कुठलेही विषय असू दयात. मागच्यावेळेस सुका कचरा, ओला कचरा अलग करण्यासाठी बकेट विकत घेतल्या ते याच प्रकारे घेतल्या, शहराच्या लोकसंख्येनुसार एवढया एवढया लागणार आहेत नंतर कुठे वाटले, काय वाटले, का वाटले नाही याचा कोणालाच पत्ता नाही. आम्ही लोक त्याचा एक दोन महिनेच पाठपुरावा करतो. आणि आम्हीही आमच्या कामामुळे दुर्लक्ष करतो पण सत्य परिस्थिती अशी आहे की भांडार विभागामार्फत जी जी खरेदी होते, ज्या बल्कमध्ये खरेदी होते ते चुकीचेच झालेले आहे. एलईडी ही खरंतर डेलीगेट वस्तु आहे. काचेची वस्तु त्याला सात-सात वर्षे सांभाळणे, आज त्याची लाईफ काय असेल. ठेकेदार सुध्दा ज्यावेळेस काम पाहिजे त्यावेळेस टचमध्ये असतात नंतर तो माणुसच अव्हेलेबल नसतो. असे कितीतरी गार्डन शहरामध्ये आहेत, मग झोपडपट्टी पुनर्वसनाच काम असू दयात, मध्ये हॉकी स्टेडीअममध्ये केबल, पोल पडलेल्या होत्या, इलेक्ट्रीकल्स पोल पडतात नंतर कच-याच्या भावामध्ये सुध्दा कोणी विकत घेत नाही. अधिकारीही नेहमीप्रमाणे तीन वर्षात बदलत असतात. कपीले साहेब तीन वर्षे आलेत नंतर तीन वर्षानंतर नाहीत, तुपे साहेब आता आहेत, आयुक्त साहेब नसतील मग याची जबाबदारी कोणाची आहे. सात कोटी रुपये आपण पाच वर्षासाठी खर्च करतो त्या पाच वर्षे ही जबाबदारी तुपे साहेब घेणार का? आपण आपल्या घरामधील वस्तु विकत घेतो ती नाजुक पध्दतीने व्यवस्थित वापरतो, एखादा बल्ब गेलातर तो काढून दुसरा लावतो अशा पध्दतीने याठिकाणी एलईडीची शहरामध्ये व्यवस्था होणार आहे का? नाहीतर असे होईल की आज टेंडर आहे, भांडारला काही देणेघेणे नाही, खरेदी करेल, तुपे साहेब बघतील, बाकी इलेक्ट्रीक डिपार्टमेंट बघतील. उदया उल्हास शेट्टीचा फोन आला तेथे लावले दहा एलईडी, मंगलाताईचा फोन आला, तीकडे लावले दहा एलईडी, योगेश बहल यांचा फोन आला हे ठिक आहे एवढया मोठया बल्कमध्ये ज्यावेळी एलईडी

घेतल्या जातात त्यावेळी एलईडी देताना त्याचे प्रॉपर नियोजन होणार आहे का? याचा फायदा शंभर टक्के आहे व ही काळाची गरज आहे. मी आता हॉटेल तयार केले त्याठिकाणी शंभर टक्के एलईडी लावले त्याठिकाणी ४० टक्के त्याचा फायदा झालेला आहे. माझ्या दोन हॉटेलच कम्प्यारीजन केलतर ४० टक्केच कटऑफ आहे पण ईथं मुद्दा असा आहे की या गोष्टीचे नियोजन याठिकाणी कोण करणार आहे. आता काकांनी सांगीतल्याप्रमाणे मागची रिडींग आता आहे का? तरी शेवटी नागरीकांना तुम्हांला फेस करावे लागणार. फायदा किती झाला का फक्त लावून मोकळे व्हायचे. हाईटचा विषय आला, स्क्रीनगार्डचा विषय आला. आता काही ठिकाणी तुम्ही ठेकेदाराला दोन वर्षाचे मेन्टेनन्स सुध्दा दिलेले आहे पण ते लोक वेळेला हजर नसतात ते लोक फक्त गोड बोलतात आणि ॲग्रीमेंट करतात टेक्निकलीमध्ये यांचे लोक नसतात. तुम्ही पाहिजेतर विचारा, उल्हास शेट्टीने फोन केला की ते म्हणतात ठेकेदाराला आपण काम दिलेले आहे, आपल्याकडे लेबर नाहीत पण तो माणुस अव्हेलेबलच नसतो. त्याचा काय उपयोग आहे. तुम्ही ऑन पेपर एखादया एसी केबीनमध्ये बसून ॲग्रीमेंट करणे, कंडीशन्स टाकणे, प्रेशर टाकणे, विधी समिती, स्थायी समिती, जी.बी., पक्षनेते, गटनेत्यांचा तुमच्यावर दबाव पण बाकीच्यांच काय. आम्ही कुठल्या कमिटीत नाहीत म्हणून आम्ही बोलू शकत नाहीत. तुमच्याकडे आलोततर तुमच्याकडे गर्दी असते. छोटया छोटया गोष्टीसाठी तुमच्याकडे येवून आम्ही तक्रार करणार नाहीत. मग आम्ही ऑफिशिअल ज्यांच्याशी बोलायचे तो माणूस कायम मिटींगमध्ये असतात हळूच बोलतात मिटींगमध्ये आहे, आम्ही पण फोन ठेवतो. आम्हांला वेळच नाही. किरकोळ किरकोळ कामाची सुध्दा अशीच परिस्थिती आहे. उदयान, विदयूत विभाग घ्या कुठलेही विषय घ्या. या गोष्टींची काळाची गरज आहे. एलईडी, विदयूतची गरज आहे परंतु हे चाललेले चुकीचे आहे बल्क परचेसींग नसावे, त्या बल्क परचेशींग गोडावूनमध्ये डम केल्या जातात. शिलाई मशीन्स डंपींग, सायकल डंपींग. तुम्ही चेक कराव, शिलाई मशिन्स धुळखात पडलेल्या आहेत. आता जुनं दयायच का नवीन दयायच यामध्ये वाद चाललेला आहे. इथं ठराव करतो पण एकाच पण इम्प्लीमेंट होत नाही. आम्ही सगळे ठराव करतो, विधवा महिलांना दया, अपंगाना दया आम्ही बोर्ड लावतो, ठराव करतो अमुक अमुक योजना सांगतो पण नंतर ते म्हणतात की अजून याची अंमलबजावणी झालेली नाही. या जीबीला काही अर्थ आहे का नाही हा आम्हांलाच प्रश्न पडतो. विषय होतात त्याची अंमलबजावणी होत नाही. शिलाई मशीनचा ढिगारा पडलेला आहे. आपल्याकडे अधिका-यांना कोणालाच काम नाही. तुम्ही आता नवीन काम लावले आहेत काही लोकांना हातगाडी गोळा करायचे आणि पकडायचे. साहेब, तुमच ध्येय पुर्ण होत नाही हे लोक गरीबाला छळतात आणि पैसे उकळतात. आजच तुमच्या अधिका-यांनी एका टेम्पोवाल्याला पकडल आणि त्याला पाच हजार पावतीची मागणी केली तो म्हणाला माझ्याकडे एवढे पाच हजार रुपये नाहीतर, एक हजार रुपये घेऊन गाडी मोकळी केली. तुम्ही झोपडपट्टी विरहीत शहर करतात, हातगाडी विरहीत शहर करायचं आहे. पण त्याची

व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही. तुम्ही केबीनमध्ये बसून अधिका-यांना सांगतात परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. हे लोक काय करतात १० हजाराची पावती फाडावी लागेल नाहीतर आयुक्तांनी सांगीतले आहे तुमची हातगाडी जप्त होईल म्हणतात. मग तो माणुस एक हजार रुपये काढुन देतो त्याला पावती दिली जात नाही. होर्डीग्जच्या संदर्भात तुम्हांला मागच्यावेळेसच सांगीतले आहे हे लोक पैसे उकळतात. ही सगळी लोक म्हणतात की परमीशन घेतलेली आहे आणि प्रत्येकाला पाच ते दहा हजाराचा महिना हप्ता चालू आहे. आकाशचिन्ह व परवाना विभाग काय करतात. महापालिकेचे उत्पन्न वाढवा, एलबीटी बंद झालेली आहे. आता या सिजनमध्ये या सगळया लोकांनी मोठमोठे फ्लेक्स लावलेले आहेत काय केले तुम्ही. नंतर मला कळाल की या लोकांचे महिन्याला हप्ते आहेत. बघा तुम्ही, दिवाळी संपली, दसरा संपला लोकांचे अजून सुध्दा फ्लेक्स आहेत, दिवाळीच्या कमानी अजून सुध्दा आहेत आता काही दसरा, दिवाळी आहे का. गणपतीचे फ्लेक्स अजून सुध्दा आहेत. एलईडी काय, खरेदी काय, टिडीआर काय. आठ आठ, नऊ नउ महिने झाले टिडीआर नाही. माझ्याकडे गार्डन आहे, तुमच्याकड मी तीन वर्षे चक्रा मारतो. डेव्हलपमेंट डेव्हलपमेंट म्हणता बजेटमध्ये तरतुद करुन ठेवता ताब्यातच नाहीतर कस काय बजेटला करता. बजेटमध्ये तरतुद तुम्ही करता पण त्याठिकाणी आमचे कामच होत नाहीत. माझ्या वॉर्डामध्ये तुम्ही एक गार्डन घेतलेल आहे तेथे आरक्षीत जागा आहे त्या आरक्षीत जागा तुम्ही ताब्यातच घेऊ शकत नाहीत. तुम्ही घेत नाहीत, तो समोरचा देत नाही. त्याचे ऑवॉर्ड होत नाही. आम्ही वॉर्डामध्ये काय करायचं. गेली पाच वर्षे वॉर्डामध्ये मी एक रुपयाचे सुध्दा काम केलेले नाही. कुठल्या तोंडान आम्ही फेस करायचं. तेच तेच काम चाललेले आहे. डांबर लावतो, एलईडी बदलतोय, तेच ते किरकोळ काम करतो एखाद भरीव काम करा. माझ्या वॉर्डात भाजीमंडईचे रिडेव्हलपमेंटचे काम मी हातात घेतले आहे. मार्चच्या बजेटमध्ये आलंय आता महिना डिसेंबर आहे एक वर्षे झाले आता टेंडर झाले आता ती वर्क ऑर्डर होईल म्हणजे एक वर्षे होतयं. प्लॅन रेडी आहे, बजेटमध्ये आले की लगेच काम चालू झाले पाहिजे. आज डिसेंबर महिना आलेला आहे कसे काय कामं करायचे. बजेटमध्ये महत्वाच्या ठिकाणी तुम्ही कट करुन टाकता. एलईडी ही काळाजी गरज आहे आवश्यक खरेदी करा परंतु ही जी पध्दत आहे ती चुकीची आहे. आपण काय करतो, चार बल्ब पाहिजेतर चार आणतो. हे फक्त पार्टिवाईजच करा, ठेकेदाराला पोचू नका. हा तुमचा आमचा, करदात्याचा, शहराचा पैसा आहे. त्यांच्यासाठी किंवा मुठभर लोकांसाठी ही आपली मानसीकता ठेवा. आपल्या स्वत:च जळतं तवा कळतं तस आहे साहेब, मला खरं वाईट वाटत की आपल्या शहराचे सात कोटी रुपये तुम्ही एक्स, वाय ठिकाणी खड्डयात घालताय. एलईडीवाल्याचे तीन वर्षानंतर एक्सचेंज अशी स्किम असते, ते काही होत नाही, चक्रा मारुन मारुन दमतो नंतर आम्ही पाठपुरावा करत नाही याकडे लक्ष दयावे एवढीच विनंती करतो.

**मा.शुभांगी बो-हाडे -** मा.महापौर साहेब, सर्वप्रथम नवनिर्वाचीत महापौरांचे अभिनंदन. सन्मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब, गेल्या महिन्यात मी तुम्हांला ब-प्रभागातील विदयूत विभागामार्फत लेटर दिलेले होते. त्याच्यामध्ये आपली मंजूर पद-५१ आहेत आणि भरलेली पद-३१ आहेत व रिक्त पद-२० आहेत. विदयूत विभागाला काम करण्यासाठी खुप अवघड जाते. प्रभाग मिटींगला सदस्यांची आरडाओरड होते. यासाठी मी आपली दोन वेळा प्रभागामध्ये मिटींग पण लावली होती पण काही कारणास्तव तुम्ही येवु शकलेला नाहीत. पुढच्या मिटींगला आवश्यक यावे. विदयुत विभागातील जी रिक्त पदे आहेत ती भरण्याचा पुर्ण प्रयत्न करावा अशी मी विनंती करते, धन्यवाद.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रथमत: नानांचे सभागृहाच्या वतीने मी मनापासून अभिनंदन करते. आमच्यातले ज्येष्ठ सदस्य महापौरपदी विराजमान आहेत त्यामुळे आनंद वाटतो तरी पुनश्च आपले अभिनंदन. आयुक्त साहेब, खरंतर हा विषय आणताना आणि तुम्ही अशा पध्दतीचा विचार करत असताना कधी तुम्ही कोणत्या सदस्यांना विचारात घेता का. माझ्या प्रभागाची अशी अवस्था आहे की, खांब लावलेत, केबल टाकली त्याला दिड ते दोन महिने झाले मग शेवटी त्या अधिका-यांना विचारल तिथं एलईडी कधी लावता ती लवकर लावा. आम्ही लोकांना सांगतो, पंधरा-वीस लोक गोळा केली तेथे नारळ फोडला, कार्यक्रम झाला, एलईडी लागल लगल वाटल परंतु आता आम्हांला कळाल की एकत्रीत खरेदी होणार आहे आणि त्यामुळे हे प्रोसेस लांबलं, हे कितपत योग्य आहे. जर आपण मागच्या खरेदीत ठेच खाल्ली असेलतर ही प्रत्येकवेळी ठेच खायची का आणि मग म्हणायच पुढच्यावेळेला आता बदलू. पुढची वेळ आपल्याकडे येणारच नाही. तोपर्यंत आपण कोणाचातरी विचारपुर्वक त्या माणसाचा फायदा तुमच्या डोळयासमोर ठेवूनच काम केलेल असतं अशी वस्तुस्थिती आहे. पुन्हा पुन्हा त्याच चुका करायच्या, प्रत्येकवेळी ठेच खायची आणि त्याच्यामध्ये तुम्ही कोणीच प्रशासन म्हणून भरडले जात नाहीत, आम्ही १३३ नगरसेवक भरडले जातो आणि पर्यायाने आमचे नागरीक भरडले जातात. हा प्रकार कधीतरी बंद होणार आहे का नाही. विशेष म्हणजे हे पत्र तुमचं आहे. तुम्हांला कसं वाटत नाही की कसे हे बल्कमध्ये घेवू शकतो, कसं काम करु शकतो आणि तुमच्या या एकाच्या विचारापायी सगळी खरेदी थांबलेली आहे आमच्या प्रभागाची खरेदी झालेली नाही. समजा तुम्ही हा विषय तहकूब केला आणि अशाप्रकारची ही खरेदी केली नाहीतर आमच्या प्रभागातून खरेदी व्हायला, टेंडर उघडायला किती वेळ जाईल, म्हणजे परत आमचे खांब गंजायला लागतील. या विषयाचा मी पाठपुरावा करणार आहे. त्यावेळेस परत तुम्हीच सांगाल की ते पाईप गंजलेले आहेत, केबल खराब होईल मग दोन चार लोक खोदायला येतील, नवीन केबल तुम्ही टाकले आहे, नवीन खांब उभे केले आहेत. तुमचे त्याच्यावर दिवे लागायच्या आत आमचे पाईपही गंजणार आणि

केबललाही कुठेना कुठे अडचण येणार. आयुक्त साहेब, तुम्हांला कधी बल्क खरेदी करायची तो विषय तुम्ही तुमच्या पध्दतीने करा किमान माझ्या प्रभागामध्ये एलईडी त्वरीत लागु दयात.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह खरंतर आज हा विषय प्रत्येक्ष खरेदीचा आलेला आहे. खरंतर विषय चांगला आहे परंतु अडचण अशी दिसते की, महापालिका उदयाच्या काळात अडचणीत जाणार आहे हे आपल्याला माहिती आहे. आपली एलबीटी बंद झालेली आहे ५०० कोटी रुपये आपले कमी होणार आहेत. ६६ कोटी फक्त महिन्याला आपल्याला शासन देते तेही उदयाच्या काळात कदाचित मिळतील का नाही हे माहित नाही पण आपल्याला ज्या ज्या पध्दतीने बचत करता येईल, ज्या ज्या पध्दतीनं महापालिकेला उत्पन्न वाढविता येईल हे बघावे. काही ठिकाणी तुमचे खर्च कमी केले म्हणजे बचत झाली म्हणजेच तुम्हांला उत्पन्नाचा एक नवीन मार्ग तयार झाला असा त्याचा अर्थ होईल. पॉवर सेव्हिंग, पॉवर जनरेशन असंही आपल्याला सगळयांना माहिती आहे. आपले २० ते ३० टक्के बचत होणार असेलतर संपुर्ण शहरामध्ये अशाप्रकारच्या योजना केल्यातर जेणेकरुन आपली वीजबचत होईल आणि त्यातुन आपले पैसे वाचतील. आज स्ट्रीट लाईटचा विचार केलातर १२ ते १५ कोटीचे बील भरतो. १२ ते १५ कोटीच्या बीलाची रक्कम जर आपली ३० ते ४० टक्केनी कमी झालीतर ती संख्या डायरेक्ट येणार आहे ७ ते ८ कोटीवर. हे होत असताना महानगरपालिकेने गेल्या पाच ते सात वर्षामध्ये ज्या एलईडी खरेदी केल्या त्या खरेदीचे मोजमाप आपण कुठे ठेवले आहे का याचा मात्र ताळमेळ नाही. बचत झालेली आहे हे मात्र नक्की आहे याबाबत आमच्याही मनामध्ये काही शंका नाही. माझ्या माहितीप्रमाणे प्रत्येकाला अनुभव आहे की एलईडी लावल्यानंतर १०० टक्के सेव्हींग होते. परंतु महानगरपालिका म्हणून जर पाहिल गेलतर फक्त खरेदी करत राहणं आणि फिटींग सुध्दा या काढणं आणि त्या लावणं एवढच केल याच कॅलक्यूलेशन आपण प्रत्यक्ष पैसे भरण्यात कधीच केलं नाही. केंद्रशासनाची कमिटी आहे, केंद्रशासनाने तो प्रस्ताव तुम्हांला दिलेला आहे त्यांना घेवून प्रोजेक्ट करणे आपल्यावर काही बंधनकारक नाही. त्या प्रकारचा संपुर्ण शहराचा प्रकल्प आपण याठिकाणी केलातर महापालिकेची बचत मोठया प्रमाणावर होईल. आजची गरज जर पाहिलीतर काही काही ठिकाणी नवीन गाव असतील किंवा जुना भाग असेल खरोखरच अशी परिस्थिती आहे की, आमच्या सर्वांची मागणी आहे एलईडी सर्व ठिकाणी लावाव्यात. त्याचा प्रकाश चांगला आहे, एलईडीचा दिवा हा जास्त हिट होत असल्यामुळे त्याच्यावर किडे बसत नाहीत, त्याची काच घाण होत नाही, त्याचा प्रकाश स्वच्छ राहतो अशा ब-याचशा टेक्निकल गोष्टी त्याच्यामध्ये आहेत. ज्या ज्या ठिकाणी आवश्यक वाटते त्या त्या ठिकाणी आज रोजी या एलईडीला मान्यता घ्यावी. आयुक्त साहेबाना विनंती राहील की आपल्या संपुर्ण शहरात ६५ ते ७० हजार स्ट्रीटलाईट पोल आहेत, उदयानामधले वेगळे आहेत, हायमास्ट वेगळे या सगळयाचे कॅलक्यूलेशन केलेतर आपले सेव्हिंग कमीत कमी १० कोटीच्या आसपास गेल्या शिवाय राहणार

नाही. तरी या पध्दतीचा जर बीओटी बेसीसवर विचार केलातर शंभर टक्के आपली बचत होईल. बाकीचे हायमास्ट आहेत त्याच्यावर मेन्टेनन्सची कॉस्ट आपली किती आहे. परपोल तीन ते चार रुपये खर्च करतो. एवढा खर्च असेलतर आपल्या खर्चाची ही वाढीव रक्कम आहे ती कमी करता येईल. आपण ते प्रमाण कमी केल पाहिजे. आपल्या महापालिकेला जास्तीत जास्त फायदा करुन दिला पाहिजे. याठिकाणी विषय मंजूरीसाठी दिलेला आहे त्यामध्ये आवश्यक त्याठिकाणी एलईडी घ्यावेत. हे होत असताना बचतीचे धोरण आपण सादर करायला पाहिजे होतं ते बचतीच धोरण सादर केलेले नाही म्हणून याप्रकारचे प्रश्न आम्ही उपस्थित करतो. तुम्ही ते बचतीचे धोरण या लीखापडीतून बाजूला ठेवलं ते बचतीचे धोरण तुम्ही १०० टक्के अवलंबीताल अशी आमची अपेक्षा आहे. आपल्या शहरामध्ये शंभर टक्के एलईडी लाईटची व्यवस्था करावी. मागच्यावेळेस मी जयपुरच उदाहरण दिलं, जयपुरच पत्र दिल, मी तुम्हांला सांगीतल पण की, जयपुरला मराठी आयुक्त आहेत. त्यांचा प्रोजेक्ट हा अतीशय सक्सेसफुल आहे. जयपुरला महानगरपालिकेस या बचतीच्या व्यतीरीक्त काही टक्केवारी त्या बचतीतून दिली जाते. म्हणजे त्यांच ते बचतीशिवाय अतीरीक्त उत्पन्न आहे. माझी विनंती आहे की फेल झालेले प्रोजेक्ट जसे देशामध्ये आहेत तसे सक्सेस झालेले प्रोजेक्ट सुध्दा देशामध्ये आहेत. त्यामुळे कुठला फेल झाला त्याची उदाहरण डोळयापुढे घेवून आपल्याला सक्सेस कसं होता येईल याकडे लक्ष देवून जर हा प्रोजेक्ट मार्गी लावलातर आपल्या शहरामध्ये अतीशय चांगल काम होईल, बचत होईल. या विषयाला अनुसरुन ज्या बाबी आवश्यक आहेत तेवढीच खरेदी करावी. तुम्ही जे बचतीच्या बाबतीतले हेड यामध्ये वापरलेले आहे ४ कोटी ९२ लाखाच ते वगळून २ कोटीची खरेदी तात्काळ करण्यात यावी. ज्या ठिकाणी अत्यावश्यक वाटते किंवा मागणी आहे त्याठिकाणी तातडीने तो पुरवठा केला जावा त्याप्रमाणे कारवाई व्हावी अशी विनंती आहे, धन्यवाद.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझही तेच म्हणणं आहे आणि जे खरं सभागृहाच्या हिताच आहे तेच बोलण्याचा मी प्रयत्न करतो आणि त्यानंतर लगेच तुमचा जर खुलासा झालातर मला वाटत सभागृहाच्या अनेक प्रश्नांना उत्तर मिळून जातील. माझा प्रामाणीक समज असा आहे की तुम्ही आता ज्या ज्या तरतूदी प्रभागामधे होतात त्या सगळया तुम्ही मागविल्या, त्याची माहिती मागवली की, उदयानामध्ये काय पाहिजे, ईथं काय पाहिजे, तिथं काय पाहिजे त्या संकलीत करुन तुमचा कॉन्सेप्ट असा आहे की तुकडया तुकडयांनी खरेदी करण्यापेक्षा जर आपण बल्क खरेदी केलीतर आपल्याला एखादया स्टँडर्ड कंपनीबरोबर करार करता येईल, चांगली क्वॉलीटी घेता येईल, रेट वाजवी मिळतील कॉन्टेटी जास्त आहे त्यामुळे आपले प्रभागातून काम पटापट होतील असा तुमचा हेतू त्यातून दिसतो. दुसरा विषय असा आहे की, जो सेव्हींगचा विषय चाललेला आहे किंवा बीओटीचा विषय चाललेला आहे. पहिला विषय जर तुम्ही सोडला, पहिल्या विषयाला आमची काल अशी

चर्चा झाली की पहिला विषय जर मायनस केलातर १ कोटी ५५ लाखाला मान्यता आता दयायची आहे आणि उर्वरीत जो पहिला विषय आहे जो की ४ कोटी ९४ लाख रुपयाचा आहे तो बीओटीवर टाकायचा अशी साधारणत: आमची उपसूचना तयार आहे. परंतु त्यातून माझा प्रश्न असा आहे की, पहिली गोष्ट अशी आहे की हा आता नोव्हेंबर महिना संपत आला, तुमच्याकडे हातामध्ये राहीले दोन ते तीन महिने. वॉर्डामध्ये जसं मगाशी शेंडगेताईनी सांगीतले की त्यांच्या वॉर्डामध्ये पोल उभे करुन ठेवलेले आहेत, म्हेत्रेंचीही तीच परिस्थिती आहे की पोल उभे करुन ठेवलेले आहेत, केबल टाकलेली आहे फक्त त्याला लँम्प बसवायचे आहेत त्यामुळे तिथं लाईट नाही. सगळयांनी सांगीतले एलईडी बसवली पाहिजे इथपर्यंत आमचे कोणाचे दुमत नाही. प्रशांत शितोळे यांनी प्रश्न उपस्थित केला की ही व्यवस्था महापालिकेनी एकही रुपया न टाकता जर बीओटीवर कुठलीही संस्था येत असेल आणि ती काम करत असेलतर आपण का करु दयायच नाही असा त्यातला एक भाग आहे म्हणून हे ५ कोटी रुपये वाचवायचे. माझा एक साधा प्रश्न सुरगूडेनां व तुपेना असा आहे की, तुमच्याकडे बीओटी एजन्सी ऍप्रूव्हल झालेली आहे का? त्यांना हे काम दयायचे म्हणलेतर ते किती महिन्यामध्ये हे काम सुरु करणार आहेत. आमच्या मागण्या, आमच्या लोकांच्या अडचणी किती लवकर तुम्ही दुर करु शकता हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, बीओटीवर तुम्ही दिल्यानंतर जे काही आपलं सेव्हिंग होणार आहे त्या सेव्हींग मधुन साधारणत: ६० टक्के पैसे तो घेवून जाईल. परंतु तो काही कर्मवीर भाऊराव पाटिल नाही किंवा तो काही धर्मादाय आयुक्त नाही तो धंदाच करणार आहे. म्हणजे स्वत:चे पैसे तो आज टाकणार आणि उदया ते आपल्याकडून वसुल करणार सभागृहामध्ये नेमका खुलासा करावा की बीओटीवाले नेमक काय करणार आहेत, त्याच्यामध्ये आपला काय फायदा आहे, त्यास किती वेळ लागणार हे सांगावे. त्यामुळे Consumption of the time, saving of the energy, saving of the money & how fast you are going to implement that या माझ्या चार प्रश्नाचे उत्तर जर तुम्ही व्यवस्थित दिली आणि प्रशासनाचे याबद्दलचे मत काय आहे आणि Why प्रभागाचे सगळे तुम्ही एकत्रीत आणलेल आहे त्याबद्दलच्या भिन्नभिन्न लोकांच्या शंका आहेत. तरी या चार प्रश्नांच उत्तर मिळालतर मला वाटत की हे अधिक सोईचे होईल आणि त्याच बरोबर जसं म्हेत्रेनी सांगीतल, बाकीच्यांनी सांगीतल अनेकांना त्यांच्या वॉर्डाची चिंता आहे, अंधाराची आहे आणि येणा-या इलेक्शनची आहे त्यामुळे कामही फास्ट झाले पाहिजेत, बजेटही खर्ची पडलं पाहिजेत, आपली सेव्हींगही व्हायला पाहिजे. म्हणजे विजेची सेव्हींग झालीतरच पैशाची सेव्हींग होणार आहे. कदाचित हे पैसे आपण टाकल्यानंतर या विषयाला जर मंजूरी दिलीतर जे सेव्हिंग मधील ६० टक्के किंवा ७० टक्के देणार ते १०० टक्के सेव्हिंग आपलं होणार आहे पैसे टाकल्यावर. आपण टाकलेतर त्या पैशाचे व्याज किती होते आणि त्यांच सेव्हिंग किती होते

हा तुम्ही अभ्यास केलेला आहे का या गोष्टींचा खुलासा झालातर पुढचा निर्णय पटकन घेता येईल. तरी अगोदर याबद्दलचा खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

**मा.पिठासीन प्राधिकारी -** खुलासा करावा.

**मा.आयुक्त -** सन्मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. हा टेक्निकली मुद्दा आहे त्यामुळे मी बोलणे अपेक्षीत नाही तरी पण बहल साहेबांनी शेवटचा मुद्दा उपस्थित केला त्यावर चर्चा व्हावी आणि काहीतरी निर्णय घ्यावा म्हणून मी उभा राहिलो आहे. हा प्रस्ताव आणलेला होता त्या मागचा उद्देश सरळ आणि साधा होता की एलईडी एकत्रीत खरेदी केल्याने बचत होईल. ब-याचशा सदस्यांनी सांगीतले एलईडीचे कारखाने सगळीकडे झालेले आहेत, चायनामेड आहेत, सबसीडी सुध्दा असेल, मार्केट तेज आहे, भरपुर कॉम्पीटिशन आहे. शासन १०० रुपयाला बल्ब देत आहे त्यात थोडीबहूत सबसिडी पण असेल पण मार्केटच एवढ तेज आहे आणि आता आपल्याला शासनाचा पाठपुरवठा आहे, आपल्याला एनर्जी सेव्हींगमध्ये जावेच लागेल आणि त्या अनुषंगाने या आर्थीक वर्षाच्या बचतीच प्रोव्हीजन आहे आणि त्याचा योग्य विनियोग व्हावा एकत्रीत खरेदी व्हावी, कॉम्पीटिशन चांगली व्हावी, स्थापत्य, बीआरटीचे तीस टक्के, पस्तीस टक्के बिलो टेंडर चालले तसं इकडही मायनसचा ट्रेंड विदयुत विभागात यावा आणि महापालिकेचे पैसे वाचावे असा या मागचा सरळ सरळ उद्देश होता. तथापि आता पठाण मॅडम आणि कुमार साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे, पैसे वाचविण्यासाठी एखाद दुसरी गोष्ट सजेशन करता आलीतर प्रयत्न करण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रशांत शितोळे यांनी सांगीतले आपल्या शहरासाठी विचार केला पाहिजे, आपण चांगला विषय काढला. जयपुर पॅटर्नप्रमाणे तूपे, सुरगूडे यांना जयपुरला पाठवायचं त्यांनी त्याचा अभ्यास करुन जिथं जयपुर आहे तिथ पीसीएमसी लीहायचं आणि टेंडर प्रसिध्द करायचं तसंही आपल्याला करता येईल. तशा सूचना दिलेल्या आहेत. ते पुढच्या आठवडयामध्ये जयपुरला जातील तेथील अभ्यास करुन आपण सगळया शहरात एलईडी लावून कायमची दिवाळी कशी करता येईल हे बघायचे आहे. त्यामध्ये इलेक्ट्रीकल बचत करुन आपला फायदा कसा करता येईल ते बघायचं आहे. मीतर या मताचा आहे की आपल्याला कॅपीटल कॉस्ट सुध्दा लावायची गरज नाही. कारण आपल्याकडे एवढी मागणी आहे की सगळेजण येतात व म्हणतात आम्हीच पैसे टाकतो फक्त आम्हांला नंतर तुमच्या ऊर्जा बचतीच्या बीलातून थोडे थोडे पैसे दया तसाही प्रयत्न आपण करु यात. आता आपल्याकडे वेळ पण फार कमी आहे. डिसेंबर ते मार्च असा चार महिने आहे. हे पैसे ज्या गोष्टीसाठी आपण बजेटमध्ये तरतूद केली त्या गोष्टीसाठी ते लवकरात लवकर वापरण्यासाठी De-centralise करणे योग्य राहील का centralise करणे योग्य राहील याचा सारासार विचार करुन आपण जो निर्णय घ्याल त्याची अंमलबजावणी आम्ही करु असं मला सांगायच आहे. याव्यतीरीक्त काही टेक्निकल मुद्दे आपल्याला विचारायचे असतीलतर तुपे साहेब सांगतील.

**मा.तुपे (सहशहर अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या शहरात एकूण ७६७९८ दिवे आहेत त्यापैकी ६० हजार २४४ दिवे सोडीयम आणि वेगळया टाईपचे आहेत आणि १६५५४ दिवे हे आपण यापुर्वी एलईडीमध्ये बदलण्यात आलेले आहेत. याच्यामध्ये सबसिडीबाबत विचारण्यात आलेले होते तरी याच्यामध्ये सबसिडी मिळण्याचा प्रस्ताव आपल्याकडे आलेला नाही परंतु सन्मा. सदस्य प्रशांत शितोळे यांनी सांगीतले त्यानुसार बीओटी बाबत काही शहरामध्ये त्यांनी जसा जयपुरचा उल्लेख केला की अशाप्रकारची योजना सुरु आहे. परंतु त्याबाबतची आपण अजून माहिती घेतलेली नाही. एलईडी आपण बसविले त्यामध्ये असे दिसून येते की ४० ते ५० टक्के आपल्याला सेव्हींग मिळते त्या व्यतिरीक्त काही सन्मा.सदस्यांचा मुद्दा होता भांडार विभागामार्फत खरेदी केल्यामुळे काही तांत्रीक अडचणी येतात त्यामुळे हे भांडार विभागाच्या मदतीने विदयूत विभाग एकत्रीतपणे खरेदी करते. परंतु ही खरेदी करताना प्रत्येक प्रभागातील अभियंत्यांकडून आपण त्याना मिळालेल्या बजेट प्रोव्हीजनप्रमाणे आपण सविस्तर माहिती घेतलेली आहे आणि ही एकत्रीत खरेदी केल्यानंतर आपण त्याप्रमाणे तिथल्या अभियंत्यांकडूनच आपण त्याची भांडारामध्ये तपासणी करुन त्या त्या प्रभागामध्येच परत जाणार आहे. याच्यामध्ये पेमेंट टर्ममध्ये काही पैसे राखून ठेवावे असा मुद्दा उपस्थित केलेला होता तरी त्याप्रमाणे आपण सर्व टेस्टींग झाल्यानंतर ९० टक्के पेमेंट करणार आहोत त्यानंतर तीन महिन्यानी १० टक्के पेमेंट करणार आहोत आणि १५ टक्के बँक गॅरंटी घेणार व ५ टक्के सिक्युरीटी डिपॉझिट पाच वर्षानी आपण परत करणार आहोत. पुर्वी एलईडी बसविली त्याच्यामध्ये अडचण येत होती की कॉन्ट्रॅक्टरची आपण १० टक्के रक्कम राखून ठेवली होती परंतु ही १० टक्के रक्कम ठेवल्यानंतरही काही एलईडी उत्पादन होते त्यांच्याकडे कॉन्ट्रॅक्टरने जरी त्यांना कळवलं तरी तो दुरुस्ती करता प्रतीसाद मिळत नव्हता म्हणून या उत्पादकाला थेट आपल्याला संपर्क करता यावा आणि त्याला याच्यामध्ये जबाबदार धरता यावे म्हणून हा एकत्रीत खरेदीचा निर्णय झाला. त्याच्या संबंधीत दोन व्यक्तींचे मोबाईल नंबर जे आपल्याला पुर्ण ३६५ दिवस उपलब्ध असतील अशा पध्दतीने त्यांची माहिती आपण घेणार आहोत. त्याचप्रमाणे त्यांचे कडून आपण ॲफेडेव्हीडही घेणार आहोत. आता जी काही प्रभागामध्ये एलईडी दिव्याच्या सर्व्हिसची अडचण येते ती निराकरण करण्याचा आम्ही जास्तीत जास्त प्रयत्न केलेला आहे. सन्मा.सदस्यांनी एलईडी बाबतीत काही ज्ञान अवगत आहे का असा मुद्दा काढला होता तरी पुर्वी बल्ब होते त्यानंतर टयुबलाईट आली त्यानंतर आपण सोडीयम व्हेपर वापरायला लागलोत त्याचप्रमाणे या एलईडीबाबत आम्ही ज्ञान अवगत केलेलं आहे व पाच वर्षाची आपण बँक गॅरंटी घेत आहोत त्यामुळे टेक्नॉलॉजी ही अपग्रेड होतच असते आणि त्याप्रमाणे आपल्यालाही अपग्रेड व्हावच लागतं. आपल्याकडे एकूण २७ एलईडीच्या मॅन्यूफॅक्चरींग कंपन्या ॲप्रूव्ह झालेल्या आहेत व दोन ते तीन कंपन्या बाहेरच्या देशातील आहेत. बीओटी बाबतीत अजून कोणी ॲप्रूव्ह झालेले नाही, बीओटी बाबतीत आम्ही

काही अभ्यास केलेला नाही परंतु हे दिवे जर आपण बसविलेतर त्याबाबत मी आपल्याला माहिती देवू शकतो. आता जो प्रस्ताव ठेवलेला आहे, हे दिवे बसविलेतर १७ लाख २२ हजार युनीट ही सेव्हींग होणार आहे. टोटल सेव्हींग १ कोटी १७ लाख पहिल्या वर्षाला होईल. जर पाच टक्के दरवाढ झालीतर ती दुस-या वर्षा १ कोटी २३ लाख तीस-या वर्षी १ कोटी ३० लाख चौथ्या वर्षी १ कोटी ३७ लाख आणि पाचव्या वर्षात १ कोटी ४५ लाख. असे मिळून ६ कोटी ५५ लाखाची सेव्हींग होईल. एलईडीचे लाईफ जे असते ते जवळ जवळ साडेबारा वर्षे असते त्याचप्रमाणे आपण एलईडी लावल्यानंतर त्याची मेन्टेनन्स कॉस्ट मोठया प्रमाणात कमी होते.

**मा.अजीत गव्हाणे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी एलईडीचा विषय आलेला आहे. सर्वांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मुख्यत: आपल्या एलबीटीचे उत्पन्न कमी झालेले आहे त्या अनुषंगाने आपल्याला काही पर्याय निवडावे लागणार आहेत. याच्यामध्ये आपण सेव्हींगचा विचार करतो परंतु तुपे साहेब व सुरगूडे साहेबांना मला सांगायचे आहे की सेव्हींगबरोबर आपण जर वीज जनरेट करु शकलोतर नक्कीच आपल्या शहराचा अधिकचा फायदा होईल त्यादृष्टीने तसा विचार झाला पाहिजे. प्रशांत शितोळे यांनी सांगीतले अशाप्रकारे जयपुरमध्ये होवू शकततर आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये सुध्दा होवू शकतं मुख्यत: यामध्ये नगरसेवक म्हणून आमच्या मनामध्ये जे प्रश्न आहेत आता तुपे साहेबांनी उल्लेख केला की एलईडी लागतो, नंतर गेल्यानंतर तो लावायचा म्हणलेतर आम्हांला खुप प्रवास करावा लागतो आणि नागरीक त्याठिकाणी पाठपुरावा करत असतात, प्रत्यक्षात दिवा लागायला वेळ लागतो. या अडचणी सुटल्या पाहिजेत. आपल्याकडे जी दिव्याची संख्या आहे, आमची अपेक्षा काय असणार आमच्या प्रभागामध्ये सर्व दिवे एलईडी लागले पाहिजे. तुम्ही कसे डिव्हाईड करणार आहेत. नागरीकांची मागणी अशी असते या रस्त्यावर एलईडी लावलीतर त्या रस्त्यावर सुध्दा लावले पाहिजे. त्यासंदर्भातील काय धोरण आहे तो सुध्दा खुलासा केला पाहिजे. नेमके दिवे कुठल्या रस्त्यावर लावणार त्याला काहीतरी क्रायटेरीया ठेवला पाहिजे. त्यादृष्टिने विचार झाला पाहिजे. आयुक्त साहेब आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे की आपल्याला स्वत:ची इलेक्ट्रीकसिटी जनरेट करता येईल का. एमएसईबीच्या ऑफीसरशी असे बोलून हे बघावे. काळाची ही गरज आहे आपल एलबीटीचे उत्पन्न कमी झालेले आहे बाकीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने आपल्याला विचार करावा लागणार आहे. त्या अनुषंगाने विदयूत विभागाने याच्यामध्ये लक्ष घालावे आणि पुढच्या काळामध्ये काहीतरी उपाययोजना कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण हा विषय मंजुर करु याच्यामध्ये उपसूचना देवु. हा विषय मंजूर यासाठी करायचा की वेळ कमी आहे, बजेट खर्ची पडले पाहिजे, अंधार दुर व्हायला पाहिजे. १७ लाख युनीटला ६ कोटी वाचणार असतीलतर, एवढी मोठी बचत होणार असेलतर आपल्याला पुढे जायला काहीच हरकत नाही.

माझी उपसूचना अशी असेल की हा विषय मंजूर करताना बीओटी बेसीसवर मंजूरी देतो यामध्ये जो विषय आयुक्तांना योग्य वाटेल त्याप्रमाणे निर्णय ताबडतोब घ्यावा. हे काम थांबल नाही पाहिजे हा विषय लवकरात लवकर झाला पाहिजे.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विदयुत विभागाअंतर्गत होणा-या विवीध विकास कामाअंतर्गत उर्जाबचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज निवीदा कामानुसार खरेदी करुन उभारणी केल्या जातात. सदर एल.ई.डी. फिटींग्जची एकत्रीतपणे खरेदी केल्यास उत्पादक कंपनीकडून स्पर्धात्मक दर प्राप्त होतील व दर्जात्मक साहित्यही प्राप्त होईल. याकरीता विदयूत विभागाकडून एकत्रीतपणे आवश्यक एल.ई.डी. फिटींग्जची खरेदी करण्यात याव्यात अशा सुचना मा.आयुक्त यांनी केल्या आहेत. त्या अनुषंगाने सोबतच्या तक्त्यामध्ये एकूण खरेदीचे ३ स्वतंत्र कामांमध्ये वर्गीकरण केलेले आहे. त्यामध्ये अ.क्र. २ व ३ चे लेखाशिर्ष मंजूर करण्यास व मनपा तर्फे खरेदी करण्यास व त्यानंतर सर्व प्रकारच्या एल.ई.डी. फिटींग्ज मनपा तर्फे अथवा BOT म्हणजेच स्ट्रीटलाईट सह सर्व विभागाचे बाहय व अंतर्गत विदयुत व्यवस्थेसह BOT तत्वावर करणेस व त्याकरिता मनपा हिताचा विचार करुन मनपाच्या हद्दीत १०० % LED विदयुत व्यवस्था वीज बचत व्हावी या करिता योग्यरितीने राबविणेस व त्याकरिता रितसर प्रक्रीया करणेस मा.आयुक्त यांना सर्व अधिकार देणेस मान्यता देणेत यावी तसेच विज बचत व वीज उत्पादनाचे इतर सर्व प्रकारच्या विविध तंत्रज्ञानाबाबत मनपा हद्दीत वापर होणेचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना देणेत यावे.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- प्रभाग क्र. ४१ मध्ये कोहिनुर व्हायोना शेजारील जागा म.न.पा. च्या ताब्यात आलेली आहे. सदर जागेवर उदयान विकसीत करण्याची मागणी तेथील नागरीक करीत आहे. म.न.पा.च्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात पान क्र. ३२१ अ.क्रं. ११३ वर प्रभाग क्र. ४१ मध्ये कोहिनूर व्हायोना शेजारील जागा विकसीत करणे या कामाचा समावेश आहे. परंतु सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये केवळ र.रु. १४,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. परंतु सदरची प्रशासकीय मान्यता स्थापत्य विषयक कामे करण्यासाठी अपुरी असल्याने र.रु.१,००,००,०००/- (र.रु. एक कोटी) इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र. ७३४ दि.२५/०८/२०१५ अन्वये सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे बर्ड व्हॅली येथे लेसर शो साठी आवश्यक कामे करणे या कामाचा समावेश करणेस तसेच वर्गीकरण करणेस मान्यता दिली असलेने प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे बर्ड व्हॅली येथे लेसर शोसाठी आवश्यक कामे करणे या कामास व त्यांस येणा-या अपेक्षित खर्च र.रु. १०,००,००,०००/- फक्त इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. तसेच क क्षेत्रिय कार्यालय मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये नविन

कामांचा समावेश करुन अंदाजपत्रक तयार करणेसाठी खालील या कामांचा समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र. ४० मधील कामगारनगर व खराळवाडी भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे व चौक सुशोभिकरण करणे. | ४५ लाख |
| २. | प्रभाग क्र. ४० मध्ये एच.ए. कॉलनीमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयासभोवती मेघडंबरी व सुशोभिकरण करणे. | ४५ लाख |
| ३. | एच.ए.कॉलनी मधील विठ्ठल रुक्मिणी मंदीराजवळ पालखी विसावा व पालखी मार्गाचे सुशोभिकरण करणे. | ४५ लाख |
| ४. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन गंगानगर व संत रोहिदास मंच परिसरातील सुशोभिकरण करणे. | ४५ लाख |
| ५. | प्रभाग क्र. ४० मध्ये वास्तुउदयोग कामगारनगर परिसरातील प्रमुख रस्ते व चौक यांचे सुशोभिकरण करणे तसेच स्थापत्य विषयक दुरुस्ती करणे. | ४५ लाख |

इत्यादी कामांचे विकास कामे करणे आवश्यक आहेत.

सदर कामांची निकड पाहता मनपाच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील खालील कामांची तरतुद वरील कामासाठी मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | पान क्र./अ.क्र. | कामाचे नाव | तरतूद |
|---|---|---|---|
| १. | ६४६/४६ | प्रभाग क्र. ४० एच.ए. कॉलनी मध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे. | ४० लाख |
| २. | १८/७ | महिंद्रा कंपनीच्या जागेत pcmc मुख्य कार्यालयाची विस्तारीत इमारत बांधणे. | ५५ लाख |
| ३. | १७७/७६ | आयटू आर आयटू सी अंतर्गत ताब्यात असलेल्या जागेला कंपाऊंड बांधणे व | १५ लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तार कंपाऊंड (चेनलिंग फेनसिंग) करणे. | |
| ४. | १७१/३२ | प्रभाग क्र. ४० येथील बालभवन इमारतीचे फॉल सिलिंग करणे व अनुषंगिक कामे करणे. | १५ लाख |
| ५. | १७९/११३ | गंगानगर मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनामधील स्थापत्य विषयक कामे व रंगरंगोटी करणे. | ५ लाख |
| | | एकूण | १ कोटी ३० लाख |

क क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र. ४० खराळवाडी मधील वरील कामाची तरतूद खर्ची पडणार नाही म्हणून नविन अंदाजपत्रक तयार करुन या कामावरील तरतूद वरील कामास तरतुद वर्गीकरण करुन वरील कामे काढण्यास खर्ची पडणार असल्याने त्यास मान्यता देण्यात यावी.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा. महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ७८३ विषय क्रमांक - २

दिनांक- २०/११/२०१५ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/मु.का./१८७/२०१५, दि. ०६/१०/२०१५

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१५ दि.६/११/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाअंतर्गत होणाऱ्या विविध विकास कामाअंतर्गत उर्जाबचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज निविदा कामानुसार खरेदी करून उभारणी केल्या जातात. सदर एल.ई.डी.फिटींग्जची एकत्रितपणे खरेदी केल्यास उत्पादक कंपनींकडून स्पर्धात्मक दर प्राप्त होतील व दर्जात्मक साहित्यही प्राप्त होईल. या करीता विद्युत विभागाकडून एकत्रितपणे आवश्यक एल.ई.डी फिटींग्जची एकत्रित खरेदी करण्यात याव्यात अशा सुचना मा.आयुक्त यांनी केल्या आहेत.

त्यानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालय व उद्यान विभागाकडून सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील "उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे" व " सार्वजनिक

सुरक्षितता" आणि "उद्याने" या लेखाशिर्षावरील कामाअंतर्गत एल.ई.डी. फिटींग्जची मागणी व त्याकरीता आवश्यक तरतूदीसह दिलेल्या माहीतीनुसार, सर्व क्षेत्रीय कार्यालय व उद्यान या विभागांकडून केलेल्या मागणीनुसार सदर कामात वेगवेगळ्या क्षमतेचे एल.ई.डी फिटींग्जसाठी खालील नमूदनुसार खर्च अपेक्षित आहे. तर क्षेत्रीय कार्यालय व उद्यान विभागाकडून सदर नमूद लेखाशिर्षांवर एल.ई.डी. फिटींग्जसाठी राखून ठेवलेली उपलब्ध तरतूदीतून सदर खर्च करता येईल.कामांचे वर्गीकरण करतांना प्रपत्र १ ,२ व ३ अन्वये वाढ / घट तक्त्यानुसार करणेत आलेली आहे.

या लेखाशिर्षांतर्गतचे कामांचे अनुषंगाने खालील नमूदनुसार एकूण खरेदीचे ३ स्वतंत्र कामांमध्ये वर्गीकरण केल्यास कामात सुसुत्रता येईल.

| अ. क्र. | सन २०१५-१६ अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष | नव्याने नमूद कामाचे नांव | वर्गीकरण करावयाचे लेखाशिर्ष | वर्गीकरण करावयाची प्रशा.मान्यता | वर्गीकरण करावयाची तरतूद (वाढ - घट तक्त्यानुसार) |
|---|---|---|---|---|---|
| १ | उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे | अ, ब, क, ड, ई व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील विभागातील जुन्या सो.व्हे. फिटींग्ज काढून उर्जा बचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे. | ५३०००००० | ४९४२४१०० |
| २ | सार्वजनिक सुरक्षितता | अ, ब, क, ड, ई व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील लेखाशिर्षावरील कामांकरीता मागणीनुसार उर्जाबचती कामी मध्यवर्ती भांडारा मार्फत एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | मध्यवर्ती भांडार विद्युत साहित्य खरेदी | १२०००००० | १११९६००० |
| ३ | उद्यान विद्युत | उद्यान/भु.ग.यो./ज.शु.कें. मधील विद्युत कामांकरीता मागणीनुसार उर्जाबचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | उद्यान विद्युत | ४७००००० | ४३५५२०८ |
| | | **एकूण** | | **६९७०००००** | **६४९७५३०८** |

सबब उपरोक्त नमूद प्रमाणे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात "उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे " व " सार्वजनिक सुरक्षितता" आणि "उद्याने" या लेखाशिर्षाअंतर्गत विविध प्रकारच्या एल.ई.डी फिटींग्ज खरेदीकामी उपरोक्त नमूद तीन नविन कामांचा सामावेश करून कामांसाठी लागणारी तरतूद व शिल्लक तरतूद यानुसार वाढ / घट तक्त्यानुसार ( प्रपत्र १ २ व ३ ) नमूद लेखाशिर्षानिहाय वर्गीकरण करणेस व त्याकरीताच्या

कामास व खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विदयुत विभागाअंतर्गत होणा-या विवीध विकास कामाअंतर्गत उर्जाबचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज निवीदा कामानुसार खरेदी करुन उभारणी केल्या जातात. सदर एल.ई.डी. फिटींग्जची एकत्रीतपणे खरेदी केल्यास उत्पादक कंपनीकडून स्पर्धात्मक दर प्राप्त होतील व दर्जात्मक साहित्यही प्राप्त होईल. याकरीता विदयूत विभागाकडून एकत्रीतपणे आवश्यक एल.ई.डी. फिटींग्जची खरेदी करण्यात याव्यात अशा सुचना मा.आयुक्त यांनी केल्या आहेत. त्या अनुषंगाने सोबतच्या तक्त्यामध्ये एकूण खरेदीचे ३ स्वतंत्र कामांमध्ये वर्गीकरण केलेले आहे. त्यामध्ये अ.क्र. २ व ३ चे लेखाशिर्ष मंजूर करण्यास व मनपा तर्फे खरेदी करण्यास व त्यानंतर सर्व प्रकारच्या एल.ई.डी. फिटींग्ज मनपा तर्फे अथवा BOT म्हणजेच स्ट्रीटलाईट सह सर्व विभागाचे बाहय व अंतर्गत विदयुत व्यवस्थेसह BOT तत्वावर करणेस व त्याकरिता मनपा हिताचा विचार करुन मनपाच्या हद्दीत १०० % LED विदयुत व्यवस्था वीज बचत व्हावी या करिता योग्यरितीने राबविणेस व त्याकरिता रितसर प्रक्रीया करणेस मा.आयुक्त यांना सर्व अधिकार देणेस मान्यता देणेत येत आहे तसेच विज बचत व वीज उत्पादनाचे इतर सर्व प्रकारच्या विविध तंत्रज्ञानाबाबत मनपा हद्दीत वापर होणेचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना देणेत येत आहेत. तसेच प्रभाग क्र. ४१ मध्ये कोहिनुर व्हायोना शेजारील जागा म.न.पा. च्या ताब्यात आलेली आहे. सदर जागेवर उदयान विकसीत करण्याची मागणी तेथील नागरीक करीत आहे. म.न.पा.च्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात पान क्र. ३२१ अ.क्रं. ११३ वर प्रभाग क्र. ४१ मध्ये कोहिनूर व्हायोना शेजारील जागा विकसीत करणे या कामाचा समावेश आहे. परंतु सदर कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. ६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये केवळ र.रु. १४,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. परंतु सदरची प्रशासकीय मान्यता स्थापत्य विषयक कामे करण्यासाठी अपुरी असल्याने र.रु.१,००,००,०००/- (र.रु. एक कोटी) इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र. ७३४ दि.२५/०८/२०१५ अन्वये सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे बर्ड व्हॅली येथे लेसर शो साठी आवश्यक कामे करणे या कामाचा समावेश करणेस तसेच वर्गीकरण करणेस मान्यता दिली असलेने प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे बर्ड व्हॅली येथे लेसर शोसाठी आवश्यक कामे करणे या कामास व त्यांस येणा-या अपेक्षित खर्च र.रु. १०,००,००,०००/- फक्त इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच क क्षेत्रिय कार्यालय मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये नविन कामांचा समावेश करुन अंदाजपत्रक तयार करणेसाठी खालील या कामांचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र. ४० मधील कामगारनगर व खराळवाडी भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे व चौक सुशोभिकरण करणे. | ४५ लाख |
| २. | प्रभाग क्र. ४० मध्ये एच.ए. कॉलनीमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयासभोवती मेघडंबरी व सुशोभिकरण करणे. | ४५ लाख |
| ३. | एच.ए.कॉलनी मधील विठ्ठल रुक्मिणी मंदीराजवळ पालखी विसावा व पालखी मार्गाचे सुशोभिकरण करणे. | ४५ लाख |
| ४. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन गंगानगर व संत रोहिदास मंच परिसरातील सुशोभिकरण करणे. | ४५ लाख |
| ५. | प्रभाग क्र. ४० मध्ये वास्तुउदयोग कामगारनगर परिसरातील प्रमुख रस्ते व चौक यांचे सुशोभिकरण करणे तसेच स्थापत्य विषयक दुरुस्ती करणे. | ४५ लाख |

इत्यादी कामांचे विकास कामे करणे आवश्यक आहेत.

सदर कामांची निकड पाहता मनपाच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील खालील कामांची तरतुद वरील कामासाठी मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | पान क्र./अ.क्र. | कामाचे नाव | तरतूद |
|---|---|---|---|
| १. | ६४६/४६ | प्रभाग क्र. ४० एच.ए. कॉलनी मध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे. | ४० लाख |
| २. | १८/७ | महिंद्रा कंपनीच्या जागेत pcmc मुख्य कार्यालयाची विस्तारीत इमारत बांधणे. | ५५ लाख |
| ३. | १७७/७६ | आयटू आर आयटू सी अंतर्गत ताब्यात असलेल्या जागेला कंपाऊंड बांधणे व तार कंपाऊंड (चेनलिंग फेनसिंग) करणे. | १५ लाख |
| ४. | १७१/३२ | प्रभाग क्र. ४० येथील बालभवन इमारतीचे फॉल सिलिंग करणे व | १५ लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अनुषंगिक कामे करणे. | |
| ५. | १७९/११३ | गंगानगर मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनामधील स्थापत्य विषयक कामे व रंगरंगोटी करणे. | ५ लाख |
| | | एकूण | १ कोटी ३० लाख |

क क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र. ४० खराळवाडी मधील वरील कामाची तरतूद खर्ची पडणार नाही म्हणून नविन अंदाजपत्रक तयार करुन या कामावरील तरतूद वरील कामास तरतुद वर्गीकरण करुन वरील कामे काढण्यास खर्ची पडणार असल्याने त्यास मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मापिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७८४ विषय क्रमांक - ३

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.भारती फरांदे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१७ दि.६/११/२०१५

सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्रमांक १४ मधील वीर सावरकर उद्यानातील गणेश तलावामध्ये आधुनिक पध्दतीचे संगीत कारंजे उभारणे व तदनुषंगीक कामे करणे (पान क्र.३१९ अ.क्र.६७) या नावा ऐवजी प्रभाग क्र.१४ मधील वीर सावरकर उद्यानातील गणेश तलावामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७८५ विषय क्रमांक - ४

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सुरेश म्हेत्रे, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव -

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१८ दि.६/११/२०१५

मौजे च-होली हा भाग नव्याने महापालिकेमध्ये समाविष्ट झालेला आहे. सदर भागामध्ये फार मोठया प्रमाणावर गृहप्रकल्प होत आहेत. त्यामुळे त्या भागातील लोकसंख्या झपाटयाने वाढत असून नागरिकांकडून च-होलीमध्ये उद्यान करण्याची मागणी होत आहे. महापालिकेच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात विषयांकीत कामाचा समावेश आहे. सदर कामामध्येच सिमाभिंतीसह उद्यान विकसित आणि वाघेश्वर मंदिर परिसर सुशोभित करण्याचे नियोजन आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकीय र.रु.२,५०,००,०००/- इतकी अपेक्षित आहे. तरी सदर कामाचे नांवात प्र.क्र.७ च-होली येथील आरक्षण क्र.२/६४ मध्ये उद्यान विकसित करणे आणि वाघेश्वर मंदिर परिसर सुशोभित करणे असा बदल करणेस व त्यासाठी अपेक्षित सुधारीत अंदाजपत्रक र.रु.२,५०,००,०००/- चे खर्चास तसेच सदर कामावरील मूळ आणि वाढ केलेली तरतूद नावात बदल केलेल्या कामावर घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७८६ विषय क्रमांक - ५

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.भारती फरांदे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१९ दि.६/११/२०१५

मनपाच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात स्थापत्य उद्यान लेखाशिर्षांतर्गत पान क्र.३२२ अ.क्र.१४५ वर प्रभाग क्र.६२ दापोडी आई उद्यानाजवळ पवना नदीकाठी बोटक्लब

विकसित करणे अशा नावाने कामाचा समावेश आहे. सदर कामाचे नावात प्रभाग क्र.६२ दापोडी आई उद्यानात “ आई ” शिल्प उभारणे व स्थापत्य विषयक कामे करणे असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७८७ विषय क्रमांक - ६

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.भारती फरांदे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.२० दि.६/११/२०१५

प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर पर्यावरणे संस्कार उद्यानामध्ये खडी मुरुमाचा रस्ता करणे (अंदाजपत्रक पान क्र.३२१ अ.क्र.१२१) या कामाचे नावामध्ये प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर मधील मोकळी जागा क्रमांक ५० मध्ये बहुउद्देशिय हॉल बांधणे असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि /कावि /१८/७४/२०१५ दि.४/११/२०१५

शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१५/४२८/प्र.क्र.१३८/१५/नवि -१३, दि१५/७/२०१५. अन्वये शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत

“पिंपरी चिंचवड वाढीव हद्दीच्या मंजूर विकास आराखड्यामधील लाल पूररेषेच्याबाहेरील ना-विकास वापर विभागात दर्शविलेले क्षेत्र सलग रहिवास क्षेत्राची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने व सुनियोजित विकास होण्याच्या दृष्टीने रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कलम ३७ चा प्रस्ताव त्यांच्या स्तरावरुन कार्यान्वित करुन शासनास सादर करण्याचे अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये निदेश देण्यात येत आहेत.

प्रस्तुत निदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत सदर फेरबदल प्रस्तावा संदर्भातील कलम ३७(१) खालील सूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याची दक्षता नियोजन प्राधिकरणाने घ्यावी.”

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत सन १९९७ मध्ये समाविष्ट झालेल्या क्षेत्राच्या विकास योजनेस शासनाने दिः- ३०/८/२००८, दिः- १८/८/२००९ चे निर्णयान्वये भागशः मंजूरी प्रदान केली आहे. तसेच वाढीव हद्दीचे विकास योजनेतील पुर्नप्रसिध्द केलेल्या सारभूत स्वरुपाचे फेरबदलांचे प्रस्ताव ई.पी क्र. १ ते ११८ बाबत दिः- २/३/२०१५ चे अधिसूचनेव्दारे शासनाने निर्णय घेतला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द करतांना मुळा, पवना व इंद्रायणी नदीस लागून सुमारे १०० – २०० मी. अंतराचा हरित पट्टा नदीचे पाण्याचे थेट प्रदुषण व पूराचा धोका टाळण्यासाठी प्रस्तावित केला आहे. तसेच नाल्यांच्या दोन्ही बाजूस सुमारे १२.५० मी. रुंदीचा हरित पट्टा नाल्याची साफसफाई करण्यासाठी पोहोच उपलब्धतेसाठी प्रस्तावित केला आहे.

वाढीव हद्दीची विकास योजना कलम ३० अन्वये शासनास मंजुरीस्तव सादर करतांना मौजे किवळे येथील स.नं. ९१ मधील नदीलगतचे १०० मी. अंतरापर्यंतचे क्षेत्र हरित पट्टयात कायम ठेऊन त्याबाहेरील हरित पट्ट्यातील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित

केले होते. शासनाने दिः- १८/८/२००९ अन्वये पुर्नप्रसिध्द केलेल्या विकास योजना प्रस्तावांमध्ये नदी लगतच्या हरित पट्ट्यातील क्षेत्रासंबंधी दोन गावांसाठी कलम ३१ (१) अन्वये फेरबदल प्रस्तावित केले. त्यामध्ये ई.पी. क्र. ७२ अन्वये मौजे रावेत येथील स.नं.५६, ५४, ५३, ५२, ५१, ५०, ४२, ४१, ३१, ३२, ३३, २७, १७, २८,२६, १९, १८, १६, ४ व ३ मधील नदीचे लाल पुररेषा बाहेरील हरित पट्ट्याचे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याचा व ई.पी. क्र. ७७ अन्वये मौजे किवळे येथील स.नं. ९९ मधील नदीलगतचा १०० मी. रुंदीचा हरित पट्टा कायम ठेऊन त्या बाहेरील हरित पट्ट्यातील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले होते. तथापी शासनाने दिः- ०२/३/२०१५ रोजीचे अधिसूचनेव्दारे वाढीव हद्दीचे पुर्नप्रसिध्द विकास योजनेतील ई.पी. बाबत निर्णय घेतांना ई.पी. क्र. ७२ व ७७ विषयी निर्णय घेतला की, कलम ३१(१) अन्वये प्रस्तावित केलेला प्रस्ताव अमान्य करण्यात येत असून कलम २६ नुसार प्रस्तावित जमीन वापर कायम राहिल. त्यामुळे कलम २६ अन्वये प्रसिध्द प्रारुप विकास योजनेतील उपरोक्त दोन्ही फेरबदल प्रस्तावातील क्षेत्र हरित पट्ट्यात कायम राहिले आहे.

लाल पूररेषे (नदीचे महत्तम पूर रेषा) बाहेरील हरित पट्ट्यातील क्षेत्र कलम ३७ अन्वये रहिवास विभागात समाविष्ठ करण्याचा प्रस्ताव हा नाल्याचे दोन्ही बाजूस ठेवावयाचे १२.५० मी. अंतराचा हरित पट्टा वगळून व नदीचे हद्दीपासूनचा किमान ३० मी. अंतराचा हरित पट्टा वगळून असणे पर्यावरण व नदीचे प्रदुषण टाळण्यासाठी गरजेचे आहे. तसेच देहु रोड अँम्युनिशन डेपोचे २००० यार्डचे संरक्षित क्षेत्रातील लाल पूर रेषा बाहेरील हरित पट्ट्यातील क्षेत्राचादेखील फेरबदलाचे प्रस्तावात समावेश करता येणार नाही. पिंपरी चिंचवडमहानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे विकास योजनेतील संदर्भिय शासन निदेशास अनुसरुन कलम ३७ अन्वये करावयाचे कार्यवाहीचे अनुषंगाने नदींचे महत्तम पूररेषा बाहेरील हरित पट्ट्यातील ( नाल्याचे दोन्ही बाजूचे १२.५० मी. अंतराचा हरित पट्टा व नदीचे हद्दीपासून किमान ३० मी. अंतराचा हरित पट्ट्यातील क्षेत्र सोडून) मिळकतींची गावनिहाय माहिती खालील तक्तात नमूद आहे.

| अ.क्र. | नदी | गाव | स.नं. / गट नं. | अंदाजे क्षेत्र ( चौ.मी.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पवना | मामुर्डी | निरंक | ०० | |
| २ | | किवळे | स.नं. ९१, ९२, ९३, ९४, ९५ व ९६. | ३८,९२५ | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| ३ | | रावेत | स.नं. ५६, ५४, ५३,५२, ५१, ५०,४२, ४१, ३१, ३२, ३३, २७, १७, २८, २६, १९, १८, १६, ४ व ३. | ६२,७८७ | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| ४ | | पुनावळे | स.नं. ४२, ४३, ४५, ४६, ४७, ४८, ४९, | ७९,८५० | विकास योजना |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ५२, ५३, ३ व ४. | | नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| ५ | | दापोडी | निरंक | ०० | |
| ६ | मुळा | वाकड | निरंक | ०० | |
| ७ | | दापोडी | निरंक | ०० | |
| ८ | | बोपखेल | निरंक | ०० | |
| ९ | इंद्रायणी | तळवडे | गट नं. ३६९, ३७०, ३७१, ३७२, ३७३, ३६८, ३७७ व ३७८. | २२,५२५ | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| १० | | चिखली | गट नं. १५६६, १६५५ (१), १६५५ (२), ३३८, १४३६, २०, ४१, २, ४६, ४७, ४५, ४९, ४४, ५१, ८७ व ९०. | १,२९,८५० | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| ११ | | बो-हाडेवाडी | गट नं. २६४ ( मोशी – जूना गट नं. १३८२),२६५ ( मोशी- जूना गट नं. १३८३) व २७२ ( मोशी – जूना गट नं. १३९०) | ९,१५० | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| १२ | | मोशी | जूना गट नं. २२७, २३०,२३१, २३२, २३३ व २३९. | ६,४४५ | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| १३ | | डुडूळगाव | गट नं. २१६, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४३, ४४ व ४५. | १९,२०० | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| १४ | | च-होली | स.नं. ९३६, ९३७, ९४०, ९८३, ९८४, ९८५, ९८६, ९८७, ९९०,१०१८, १०१७, २, ३, ५ व ४. | ४७,४०० | विकास योजना नकाशात दर्शविल्याप्रमाणे |
| | | | एकूण क्षेत्र ( चौ.मी.) | ४,१६,१३२ | सुमारे ४१ हे.६१ आर |

उपरोक्त शासन निदेशानुसार वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील नदींचे लाल (महत्तम) पूर रेषा बाहेरील हरित पट्ट्यातील ( नाल्याचे दोन्ही बाजूचे १२.५० मी. अंतराचा हरित पट्टा व नदीचे हद्दीपासून किमान ३० मी. अंतराचा हरित पट्ट्यात सोडून) सुमारे ४,१६,१३२ चौ.मी. क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याकामी कलम ३७ अन्वये फेरबदलाची विहित कार्यवाही करण्यास मा. महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे.

सबब संदर्भिय शासन निदेशानुसार वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील नदींचे महत्तम पूर रेषा बाहेरील हरित पट्ट्यातील (नाल्याचे दोन्ही बाजूचे १२.५० मी. अंतराचा हरित

पट्टा व नदीचे हद्दीपासून किमान ३० मी. अंतराचा हरित पट्ट्यात सोडून) सुमारे ४,१६,१३२ चौ.मी. क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याकामी कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, फेरबदलाची सूचना प्रसिध्द झाल्यानंतर महानगरपालिकेस प्राप्त होणा-या हरकत । सूचना अर्जांबाबत संबंधितांना सुनावणी देणे, तदअनुषंगिक फेरबदलाची सर्व वैधानिक प्रक्रिया पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करणे यासंबंधीची कार्यवाही करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. रावेतपासून सांगवी पर्यंत ही जुनी गाव आहेत का फक्त नवीन गावाचे करणार आहोत याचा खुलासा पाहिजे. दोन्ही बाजूने किती अंतर ठेवणार आहेत त्याचा खुलासा करावा.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. जगताप साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबद्दल मी सांगू इच्छितो की आपल्याकडे नवीन गावचा ईपी झालेला होता त्यामध्ये ब्ल्यू लाईनचा विषय होता. नंतर राज्यशासनाने मंजूर केले त्यामध्ये ब्ल्यू लाईनचा पण विषय होता. प्रशासनाची अशी धारणा आहे की जर एकाच शहरातील १७-१८ गावासाठी एक निर्णय घेतलेला असेल ब्ल्यूलाईनसाठी तर तो बाकी शहरातील जुन्या गावातील डीपी आहे त्यांना पण आपोआप लागू होईल अशी धारणा असल्यामुळे राज्यशासनाकडे प्रस्ताव दिलेला आहे.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याचा उल्लेख तसा आलेला नाही. जुन्या गावचे सर्वेक्षण झालेले नाही. ग्रीन क्षेत्र जे आहे ते निवासीमध्ये घेण्यात याव ते याच्यामध्येच ते सविस्तर व्हायला पाहिजे.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड शहराची नवीन हद्दवाढ झालेल्या परिसराचा विकास आराखडा होता जो आपण शासनाला मंजूरीसाठी सादर केलेला होता तो शासनाने अंतीमत: ईपीसह मंजूर केलेला आहे. या विकास आराखडयामध्ये ब्ल्यू लाईन आणि रेडलाईन या पध्दतीने दर्शवून तसा विकास आराखडा मंजूर झालेला आहे. रेडलाईन्सवर काही भागामध्ये ग्रीन झोन आहे तर अशा ग्रीनझोनमध्ये वास्तविक त्याठिकाणी रेसीडेन्शीअल झोन प्रस्तावीत करणे आवश्यक होते. ग्रीनझोन असल्यामुळे शासनाने असे धोरण निश्चित केले की रेडलाईनच्या वरचा जो ऐरीया आहे तो रेसीडेन्शीअल झोनमध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने शासनाने आपल्याला महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १५४ अन्वये डायरेक्शन दिलेले आहेत त्याप्रमाणे आपल्याला कलम ३७ ची कार्यवाही करुन तसा प्रस्ताव शासनाला अंतीम मान्यतेसाठी सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत त्याअनुषंगाने आपण हा प्रस्ताव महासभेपुढे आणलेला आहे. त्यामध्ये नवीन हद्दीतील सुमारे १४ गावात जे नदीला लागून

असलेले तेथे आपली रेडलाईन्स, ब्ल्युलाईन प्रस्तावीत केलेली आहे त्यातील सुमारे दहा गाव ती अशी आहेत की, ग्रीन झोनचा रेसीडेन्शीअल झोन आपण कन्व्हर्ट करत आहोत. त्याचे एकत्रीत क्षेत्र सुमारे ४ लाख १६ हजार १३५ चौ.मी. इतके आहे. आपली मान्यता मिळालेनंतर कलम ३७ प्रमाणे सूचना/हरकती पेपरला येईल त्यावर काही ऑब्जेक्शन असतील, काही सजेशन असतीलतर त्याचा विचार करुन आपण संपुर्ण ३७ चा प्रस्ताव शासनाला मंजूरीसाठी सादर करुन नंतर रेसीडेन्शीअल झोन शासन मंजूर करेल.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ब्ल्यू लाईनमध्ये सरसगट गाव आहेत ती आपण दोन्ही बाजूची घेणार आहोत, आपण ठरावीक सर्व्हेनंबर घेतला, ठरावीकच नवीन गाव घेतले जुने गाव यामध्ये का आलेले नाहीत.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शासनाने निर्णय फक्त नवीन गावापुरता घेतलेला आहे. नवीन गावाची विकास योजना आपण सुधारीत करणार आहोत त्यावेळेला त्याचा विचार होईल आणि जुन्या हद्दीच्या गावासाठी रेडलाईन आणि ब्ल्यू लाईन आपण अदयाप दर्शवलेली नाही.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७८८ विषय क्रमांक - ७

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. नरवि /कावि /१८/७४/२०१५ दि.४/११/२०१५

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७८९ विषय क्रमांक - ८

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**विधी समिती**

अ) दि.१८/९/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.३/१०/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१६/१०/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७९० विषय क्रमांक - ९

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दि.२३/९/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१४/१०/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७९१ विषय क्रमांक - १०

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) दि.३/६/२०१५, ९/६/२०१५,१७/६/२०१५,१/७/२०१५ व १५/७/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१७/६/२०१५, १/७/२०१५, १५/७/२०१५,२४/७/२०१५, २९/७/२०१५ व ३१/७/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१५/७/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ख) दि.१४/९/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ग) दि.७/१०/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

घ) दि.२१/१०/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७९२ विषय क्रमांक - ११

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतीक समिती</u>**

अ) दि.७/१०/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७९३ विषय क्रमांक - १२

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील जा.क्र.कक्षे/कावि/१५१/२०१५ दि.२६/१०/२०१५

२) मा.प्रशांत शितोळे, मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

३) क प्रभाग समिती सभा दि.७/१०/२०१५ ठराव क्र. १४२

पिंपरी चिंचवड मनपा अंदाजपत्रक २०१४-१५ मध्ये सांगवी येथील वेताळ महाराज मंदीर परिसरातील आजुबाजुचे दुरुस्तीविषयक कामे करणे या कामाकरिता अंदाजपत्रकीय र.रु. ५ लक्ष इतकी असुन सदर कामाकरिता र.रु. २५ लक्ष इतकी अंदाजपत्रकीय रकमेची तरतुद उल्लेख व्हावा व याकरिता नव्याने लेखाशिर्ष तयार करुन त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील जा.क्र. कक्षे/कावि/१५२/२०१५ दि.२६/१०/२०१५

२) मा.प्रशांत शितोळे, मा. किरण मोटे यांचा प्रस्ताव.

३) क प्रभाग समिती सभा दि.७/१०/२०१५ ठराव क्र. १४३

सांगवी प्र.क्र. ६० मधील स.नं. ६ येथे “शिवसृष्टी” हे उदयानात छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनातील विविध प्रसंग दर्शविणेत आले आहेत सदर उदयानात छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनावरील आणखी प्रसंग याठिकाणी करणेत यावेत यासाठी नव्याने काम करणे आवश्यक आहे.

सदर उदयानात काम करणेसाठी स्थापत्य- उदयान विभाग अंदाजपत्रकात नवीन कामाचा समावेश करुन नवीन लेखाशिर्ष निर्माण करुन सांगवी येथील शिवसृष्टी उदयानात उर्वरित कामे करणे असे लेखाशिर्ष नव्याने तयार करुन सदर कामाकरिता अंदाजपत्रकीय र.रु. २ कोटी व आवश्यक तरतुद र.रु. १ लाख करणे आवश्यक आहे. तरी चालू अंदाजपत्रकात वरीलप्रमाणे नव्याने लेखाशिर्ष तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- उपरोक्त विषयामध्ये नमूद केलेल्या नवीन लेखाशिर्षावर रक्कम रु. एक लाख (१ लाख) इतकी तरतूद मनपा अंदाजपत्रक २०१५-१६ मधून पान क्र. १५८ अनु.क्र.१०२ या प्रभाग क्र. ६० सांगवी गावठाण या प्रभागातील कामातून वर्ग करणेत येवून सदरची रक्कम रु. एक लाखाची वाढ-घट करण्यास मान्यता देणेत यावी व सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता कामाची निवीदा काढणेची कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.ॲड.संदिप चिंचवडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ७९४ विषय क्रमांक - १३

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील जा.क्र. कक्षे/कावि/१५२/२०१५ दि.२६/१०/२०१५

२) मा.प्रशांत शितोळे, मा. किरण मोटे यांचा प्रस्ताव.

३) क प्रभाग समिती सभा दि.७/१०/२०१५ ठराव क्र. १४३

सांगवी प्र.क्र. ६० मधील स.नं. ६ येथे "शिवसृष्टी" हे उदयानात छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनातील विविध प्रसंग दर्शविणेत आले आहेत सदर उदयानात छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनावरील आणखी प्रसंग याठिकाणी करणेत यावेत यासाठी नव्याने काम करणे आवश्यक आहे.

सदर उदयानात काम करणेसाठी स्थापत्य- उदयान विभाग अंदाजपत्रकात नवीन कामाचा समावेश करुन नवीन लेखाशिर्ष निर्माण करुन सांगवी येथील शिवसृष्टी उदयानात उर्वरित कामे करणे असे लेखाशिर्ष नव्याने तयार करुन सदर कामाकरिता अंदाजपत्रकीय र.रु. २ कोटी व आवश्यक तरतुद र.रु. १ लाख करणे आवश्यक आहे. तरी चालू अंदाजपत्रकात वरीलप्रमाणे नव्याने लेखाशिर्ष तयार करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच उपरोक्त विषयामध्ये नमूद केलेल्या नवीन लेखाशिर्षावर रक्कम रु. एक लाख (१ लाख) इतकी तरतूद मनपा अंदाजपत्रक २०१५-१६ मधून पान क्र. १५८ अनु.क्र.१०२ या प्रभाग क्र. ६० सांगवी

गावठाण या प्रभागातील कामातून वर्ग करणेत येवून सदरची रक्कम रु. एक लाखाची वाढ-घट करण्यास मान्यता देणेत येत आहे व सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता कामाची निवीदा काढणेची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ७९५ विषय क्रमांक - १४

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील जा.क्र. कक्षे/कावि/१५३/२०१५ दि.५/११/२०१५

२) मा.प्रशांत शितोळे, मा. किरण मोटे यांचा प्रस्ताव.

३) क प्रभाग समिती सभा दि. ४/११/२०१५ ठराव क्र. १५२

प्रभाग क्र. ६० सांगवी येथील चंद्रमणीनगर येथे रबर मोल्डेड पेव्हींग ब्लॉकची कामे करणेचे काम मनपा अंदाजपत्रक २०१५-१६ मध्ये पान क्र.१६८ अ.क्र.६९/अ नमुद केले आहे. परंतु सदर कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेत शुन्यचा उल्लेख झाला आहे तरी याठिकाणी तरतुद उपलब्ध असुन तरतुदीच्या दुप्पट म्हणजे ररु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु. पन्नास लाख फक्त) अंदाजपत्रकीय रक्कम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ७९६ विषय क्रमांक - १५

दिनांक - २०/११/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. क्र.निवडणूक/१/कावि/५४०/२०१५ दि. ९ /११/२०१५

मा.भारत निवडणूक आयोग यांच्याकडील पत्र क्र.२३/एमएच/२०१४ दि.२४/११/२०१४ व मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र. CEO/MIS2014/108/33

दि.१७/११/२०१४ नुसार विधानसभा मतदार संघातील मयत, दुबार, स्थलांतरीत व मतदार यादीत फोटो नसलेले मतदार(Residual) यांचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांचेमार्फत सर्वेक्षण करुन जे मतदार त्यांच्या सर्वसाधारण पत्त्यावर राहात नसल्याचे आढळुन आल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीतुन वगळणी करुन मतदार यादी प्रमाणित व अद्ययावत करणेबाबतच्या सुचना प्राप्त आहेत. त्यानुषंगाने माहे ऑगस्ट-सप्टेंबर २०१५ मध्ये २०६ पिंपरी (अ.जा.) विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये, यादी भाग क्र. १ ते ३९९ मधील ज्या मतदारांचे मतदार यादीत फोटो नाहीत अशा मतदारांच्या ९७६८७ इतक्या नोटीसा मा. भारत निवडणूक आयोग यांचेकडुन प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी ५६८९ मतदारांची नावे यापुर्वी विहित कार्यपध्दतीने वगळणी करणेत आलेली आहे व आता ९२०१८ इतक्या मतदारांना नोटीसा वाटप करणेत आलेल्या आहेत.

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेमार्फत प्राप्त झालेल्या सदर नोटीसा बजावुन संबंधित मतदारांचे फोटो/पोचपावत्या/जबाब घेणेत आलेले आहेत. त्यायोगे यादी भाग क्र. १ ते ३९९ मधील एकुण ३२६५ इतक्या मतदारांचे फोटो प्राप्त झालेले आहेत तसेच ६८६७१ इतके मतदार सर्वेक्षणामध्ये त्यांचे सर्वसाधारण पत्त्यावर राहात नसल्याचे आढळुन आलेने अशा मतदारांचे पंचनामे करण्यात आले आहेत. त्याबाबत ज्या त्या मतदार यादीभागाच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी मतदारांची नावे कायम ठेवणे, वगळणे याबाबत सविस्तर अहवाल सादर केलेले आहेत. सदर अहवाल, जबाब व पंचनाम्यानुसार २०६ पिंपरी (अ.जा.) विधानसभा मतदार संघातील एकुण ६८६७१ सर्वसाधारण पत्त्यावर आढळत नसलेल्या व स्थलांतरीत मतदारांची वगळणी प्रस्तावित करणेत आलेली असल्याबाबत मतदार नोंदणी अधिकारी,२०६,पिंपरी(अ.जा.)विधानसभा मतदार संघ यांनी त्यांचेकडील पत्र क्र. निवडणूक/कावि/340/2015 दिनांक 7.11.2015 अन्वये कळविले आहे.

२०६ पिंपरी (अ.जा.) विधानसभा मतदारसंघांतर्गत मतदान केंद्र क्र. १ ते ३९९ साठी मतदारांची प्रस्तावीत वगळणी यादी दि. ०७/११/२०१५ नंतर मतदार सहाय्यता केंद्र, मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय, डॉ. हेडगेवार भवन, से. न. २६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११०४४, मा. CEO महाराष्ट्र यांचे वेबसाईट (www.ceo.maharashtra.gov.in), मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे (www.pune.nic.in) व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या (www.pcmcindia.gov.in) या वेबसाईटवरती अवलोकनार्थ उपलब्ध राहतील. प्रस्तावित वगळणीबाबत मतदारास दि. ४/१२/२०१५ रोजी सांयकाळी ५.३० पर्यंत मतदान नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय डॉ. हेडगेवार भवन, से. न. २६, प्राधिकरण, निगडी पुणे-४११०४४ येथे हरकती/सुचना नोंदविणेसाठी मुदत आहे. सदर वगळणी प्रक्रिया ४/१२/२०१५ नंतर पुर्ण झाल्यानंतरही कोणत्याही मतदाराला दावे व हरकती दाखल करावयाच्या असल्यास ते नव्याने नमुना ६, ७, ८ व ८अ द्वारे मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालयामध्ये दाखल करु

शकतात. मतदानाचा हक्क बजावणेसाठी मतदार संघाच्या मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. मतदार यादीतील नाव व तपशील अचूक असलेबाबतची मतदारांनी खात्री करावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील २०६, पिंपरी विधानसभा मतदार संघातील दुबार, मयत व स्थलांतरीत मतदार यांची वगळणीसाठी हरकती/सुचनांसाठी सदरची बाब सर्व मा.नगरसदस्यांच्या अवलोकनार्थ/ निदर्शनास आणून देणेत आली.

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी प्रकट केले.

--------

**मा.पिठासीन प्राधिकारी-** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

**-------**

(मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे)
पिठासीन प्राधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/०१/११६
दिनांक - ०१/०१/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.